दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –८१ शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 81 Friday, Dt.27 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

आतापर्यंत दुष्काळग्रस्त तालुक्यातील ९६ लाख ४८ हजार शेतकऱ्यांना ४ हजार ८२४ कोटींचे अर्थसहाय्य वितरित..!

एकही पात्र शेतकरी दुष्काळ निधीपासून वंचित राहणार नाही – मदत व पुनर्वसन मंत्री मकरद जाधव–पाटील

फार्मर आयडीसह तांत्रिक अडचणी पूर्ण करण्याचे आवाहन

मुंबई ।प्रतिनिधी

आतापर्यंत राज्यात ३१० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, या तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून प्रत्येकी पाच हजार रुपयांचे दुष्काळ अग्रीम वितरित करण्यात येत आहे. आज २६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत ९६ लाख ४८ हजार ४८९ शेतकऱ्यांच्या खात्यांत ४ हजार ८२४ कोटी २४ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत. राज्यातील एकही पात्र शेतकरी दुष्काळ निधीपासून वंचित राहणार नाही. फार्मर आयडी आणि काही तांत्रिक अडचणींमुळे दुष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही, त्यांच्या अडचणी दूर करून त्यांनाही मदत देण्यात येणार आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी दिली.

राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडून ९८ लाख २१ हजार २३ शेतकऱ्यांना मदत मंजूर करण्यात आली असून, त्यापैकी ९६ लाख ४८ हजार ४८९ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत वितरित झाली आहे. शेतकऱ्यांचे फार्मर आयडी, तांत्रिक अडचणी दूर होत असून अग्रीम मदत देण्याची प्रक्रियेची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सुरू असून, पात्र शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येत असल्याची माहितीही मंत्री जाधव पाटील यांनी दिली.

विभागनिहाय व जिल्हानिहाय मदत वितरण पुढीलप्रमाणे

छत्रपती संभाजीनगर विभाग..

या विभागात सर्वाधिक ३४ लाख ९३ हजार ९२० शेतकऱ्यांना १ हजार ७४६ कोटी ९६ लाख रुपये वितरित झाले आहेत. बीड जिल्ह्यात ६ लाख ३२ हजार ७४७ शेतकऱ्यांना ३१६ कोटी ३७ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर ४ लाख ९५ हजार ३७२ शेतकऱ्यांना २४७ कोटी ६९ लाख रुपये, धाराशिव ३ लाख ५९ हजार ५९५ शेतकऱ्यांना १७९ कोटी ८० लाख रुपये, हिंगोली २ लाख २८ हजार ४२४ शेतकऱ्यांना ११४ कोटी २१ लाख रुपये, जालना ४ लाख ५० हजार १६२ शेतकऱ्यांना २२५ कोटी ८ लाख रुपये, लातूर ४ लाख ३ हजार ३६४ शेतकऱ्यांना २०१ कोटी ६८ लाख रुपये, नांदेड ५ लाख ७४ हजार ४६६ शेतकऱ्यांना २८७ कोटी २३ लाख रुपये आणि परभणी जिल्ह्यात ३ लाख ४९ हजार ७९० शेतकऱ्यांना १७४ कोटी ९० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

फार्मर आयडी पूर्ण करण्याचे आवाहन..

ग्रीस्टॅक (–सीळडींरलज्ञ) डेटाच्या माध्यमातून कृषी व अन्य शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी फार्मर आयडीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. तांत्रिक अडचणींमुळे मदत जमा होण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांनी संबंधित प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. अशा अडचणी सोडविण्यास प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असेही मंत्री जाधव पाटील यांनी सांगितले.

राज्यातील एकही पात्र शेतकरी दुष्काळ मदतीपासून वंचित राहणार नाही. फार्मर आयडी पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांनाही पाच हजार रुपयांची दुष्काळ अग्रीम मदत देण्यात येईल. शेतकऱ्यांनी चिंता करू नये, शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे मंत्री जाधव–पाटील यांनी स्पष्ट केले.

आष्टीच्या गटशिक्षणाधिकारी पदाचा प्रशांत शिंदे यांच्याकडे पदभार

पदभार स्वीकारताच शैक्षणिक कामकाजाला सुरुवात

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) आष्टी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारीपदाचा अतिरिक्त कार्यभार शिरूर कासार येथे गटशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री. प्रशांत शिंदे साहेब यांनी बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६ रोजी स्वीकारला. पदभार स्वीकारताच त्यांनी शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाला सुरुवात केली असून, त्यांच्या पदभारामुळे आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात नव्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

श्री. प्रशांत शिंदे साहेबांना आष्टी तालुक्यातील शैक्षणिक कामकाजाचा पूर्वानुभव आहे. त्यांनी सन २००३ ते २०१५ या कालावधीत आष्टी येथे विस्तार अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. या बारा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. त्यामुळे तालुक्यातील शैक्षणिक परिस्थिती, शिक्षकांचे प्रश्न, शाळांचे प्रशासकीय कामकाज, शैक्षणिक उपक्रम आणि स्थानिक अडचणी यांची त्यांना चांगली जाण आहे. पूर्वानुभव आणि प्रशासकीय कौशल्याच्या बळावर ते आता आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक विकासाला निश्चितच गती देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

श्री. प्रशांत शिंदे साहेब हे मितभाषी, कार्यकुशल, शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकारी



म्हणून परिचित आहेत. प्रशासकीय कामकाजात शिस्त व पारदर्शकता राखण्याबरोबरच संबंधितांकडून जबाबदारीने काम करून घेण्याची त्यांची हातोटी विशेष मानली जाते. नियमांच्या चौकटीत राहून कामकाज करण्यावर त्यांचा नेहमीच भर असतो. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीतून आष्टी तालुक्यातील शैक्षणिक प्रशासन अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा शिक्षक, शिक्षणप्रेमी आणि नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर श्री. प्रशांत शिंदे यांचा शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी तसेच पत्रकार, प्राध्यापक यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पत्रकार तथा प्रा. निसार शेख, साई मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे आजीमोदीन बागवान, प्रा. ज्ञानदेव गाडे, प्रा. विवेक महाजन, प्रा. अजहर शेख, प्रा. सचिन वाळके आणि प्रा. लोखंडे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील प्रशासकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे, शाळांच्या प्रलंबित समस्या मार्गी लावणे, शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना विश्वासात घेणे, शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य देणे, अशा अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आल्या. एकूणच, त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा उपयोग तालुक्यातील शैक्षणिक विकासासाठी होऊन शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, तसेच त्यांच्या कार्यकाळात आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

कोषागारातील विशेष शिबिरास मुदतवाढ

बीड ।प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि.१ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्यासाठी मुदतवाढीसह विशेष अभियान राबविण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांनी जिल्हा कोषागार कार्यालयातील या शिबिरात उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी केले आहे. जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांसाठी दि.१८ ते २० नोव्हेंबर या कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालय बीड येथे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ऑनलाईन हयात प्रमाणपत्र तयार करण्याबाबत माहिती व जीवन प्रमाण पद्वारे जीवन प्रमाणपत्र तयार करुन देण्यात आले आहेत. शिबीरास निवृत्तीवेतनधारकांचा प्रतिसाद पाहता सदर शिबीरास दि. ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शिबिराचा लाभ घेण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांनी आधार कार्ड, पीपीओ क्रमांकआणि बँक खाते पुस्तिका सोबत आणावी. ऑनलाइन हयात प्रमाणपत्र तयार केल्यानंतर संबंधित निवृत्तीवेतनधारकांना डिसेंबर २०२६ चेनिवृत्तीवेतन अदा करण्यात येणार आहे. त्यानुषगाने डिजिटल पद्धतीने हयातीचे दाखले घेण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी कोषागार कार्यालयामध्ये हेल्प डेस्क तयार करण्यात आला असून त्यासाठी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.



कडा – येथील माजी सभापती कै. बबनराव बाबुराव ढोबळे यांचे चिरंजीव संग्राम व चि.सौ.कां. शुभांगी श्री. बाळासाहेब गोविंदराव कर्डिले यांची कन्या यांच्या विवाह सोहळ्याप्रंसगी नवदांम्पत्यांना शुभेच्छा देतांना पत्रकार रहेमान सय्यद, बाबु तारु, समीर सय्यद, अविनाश ढोबळे, अल्ताब शेख दिसत आहेत.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत लाभार्थी सर्वेक्षण व योजनांच्या परिणाम मूल्यांकनास सुरुवात

बीड ।प्रतिनिधी

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्यामार्फत महामंडळाच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण आणि योजनांचे परिणाम मूल्यांकन करण्याचा विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पायलट प्रकल्प राबविण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील संबंधित लाभार्थ्यांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या प्रतिनिधींना आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन महामंडळाचे बीड जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

मागासवर्गीय समाजातील घटकांचे सामाजिक व आर्थिक उत्थान करणे, त्यांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे या प्रमुख उद्दिष्टाने १० जुलै १९७८ रोजी या महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी महामंडळामार्फत विविध कर्ज व आर्थिक सहाय्य योजना राबविण्यात येतात. शासन निर्णयानुसार मे. प्रायमूव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट्स प्रा. लि. या संस्थेची तांत्रिक सहाय्य संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेच्या नियुक्त प्रतिनिधींमार्फत महामंडळाच्या विविध कर्ज योजनांच्या लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती संकलित केली जाणार आहे. या सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे महामंडळाच्या योजनांची परिणामकारकता वाढविणे, भविष्यातील योजनांचे नियोजन अधिक प्रभावी करणे आणि लाभार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यास मोठी मदत होणार आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

वर्षानुवर्षे फिरतात तक्रार अर्ज :: खऱ-या निकालांचे प्रमाण ३०% तर खोटे निकाल देण्याचे प्रमाण ७०% आहे :: कसा मिळणार न्याय...? कुठपर्यंत सहन करायचा अन्याय....??

गतिमान कारभाराची भाषा करणारे सरकार मतिमंद कार्यालये आणि बेधुंद अधिकाऱ्यांच्या जीवावर कसा देणार न्याय....?

(अंबाजोगाई / सुनील सीरसाट)

कोणत्याही पक्षाचे वा कितीही पक्षांचे सरकार येवो. सरकार सांगते सर्वसामान्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांना अगदी वेगाने न्याय दिला जाणार. मायबाप जनता आमचा अभिमान तर ज्येष्ठ नागरिक स्वाभिमान त्यामुळे निर्णय प्रक्रिया होणार गतिमान असा नारा देणाऱ्या सरकारची पोकळ भंपकबाजी आता उघडी पडली आहे.

ठरल्याप्रमाणे निवडणुका होतात. कधी बहुमताने तर कधी युतीने कसेच गणित जुळेना गेले तर महायुतीने आणि महाआघाडीने सरकारे स्थापन होतात. निवडणुकीपूर्वी आणि निवडणुका जिंकल्यावर अगदी गारांच्या मुसळधार पावसाप्रमाणे आश्वासनाची बरसात होते. परंतु जेव्हा सरकार अस्तित्वात येते आणि प्रत्यक्ष राज्यकारभार सुरू होतो. तेव्हा मात्र याच सरकारमधील मुख्यमंत्री–उपमुख्यमंत्री–मंत्री आणि अधिकाऱ्यांना मात्र सर्वसामान्य जनतेचा आणि विविध कार्यालयात लाखो अर्जदारांनी केलेल्या वेगवेगळ्या अर्जांचा विसर पडतो. आपापल्या पद्धतीने आपल्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी, तर होत असलेला आणि होऊ घातलेला अन्याय होऊ नये म्हणून न्याय मागण्यासाठी सरकारमधील शेकडो कार्यालयांमध्ये रोज हजारो अर्ज दाखल होत असतात. यातली काही बोटावर मोजण्या इतपत हेतू पुरस्कृत काही अर्ज सोडता जवळपास ९०% अर्ज हे टेबलाखालून घेण्याने आणि विविध सोयीसुविधा देण्याने व राजकीय दबावामुळे अपेक्षित निर्णय न देता





अनपेक्षित निकाल देऊन अर्जदारांना अकस्मित धक्के देण्याचे प्रमाण अलीकडे शासकीय कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढले असून, आता नेमका न्याय कुठे मागायचा हा मोठा गंभीर प्रश्न सगळीकडेच निर्माण झाला आहे.गतिमान सरकारांमधील मतिमंद कार्यालये आणि त्या कार्यालयात बहुतांश बसलेल्या बेधुंद अधिकाऱ्यांनी सुरू केलेला अंदाधुंद कारभार तक्रारदाराला, जनतेला निमुटपणे सहन करावा लागत आहे. आणि अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम त्या–त्या वेळेच्या सरकारमधील आजी–माजी आमदार–खासदार–मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी खुलेआम करताना दिसून येत आहेत. चुकीच्या गोष्टीचे समर्थन करायचे आणि अन्याय झाला म्हणून वर्षानुवर्ष सरकारी कार्यालयात खेटे मारणाऱ्या सर्वसामान्यांची, तक्रारदारांची कसलीच दखल न घेता त्यांना जाणीवपूर्वक बेदखल करण्याचा जणूकाही शासकीय कार्यालयांनी सपाटाच लावल्याचे चित्र सध्या सर्वत्रच पहावयास मिळत आहे. मग केवळ गतिमान सरकारची मोठ मोठी वेळ काढू भाषा वापरायची आणि अर्जांची दखल घेण्यास चार–चार:पाच–पाच वर्षे लावायची ही सरकारची नेमकी कोणती पद्धत आहे....? हे कळायलाच मार्ग नाही. परंतु या अशा नको त्या राजकीय हस्तक्षेपाने आणि भरमसाठ वाढलेल्या भ्रष्टाचाराने नुसती सरकार वरील विश्वासार्हता कमी होत नाहीये, तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या संविधानाने खूप मोठी लोकशाही समाजाच्या हितासाठी बहाल केली. ती लोकशाही खऱ्या अर्थाने संपुष्टात येत असल्याचे चित्र सध्याच्या सामाजिक वातावरणावरून दिसून येत आहे. तेव्हा हे असे वातावरण ना समाजासाठी चांगले आहे, ना अधिकाऱ्यांसाठी–सरकारसाठी...!परंतु येथे कोणीच कोणाची दखल घ्यायला तयार नसल्याने विदारक चित्र निर्माण होत असून जर सरकारी कार्यालयांमध्ये खऱ्या न्याय देण्याचे आणि राजकीय हस्तक्षेपाने व मोठ्या प्रमाणात पैशाची देवाणघेवाण करून खोटे न्याय मिळवायचे प्रमाण जर असेच राहिले. तर मात्र एक दिवस समाजातील स्थिरता संपून समाज जेव्हा अस्थिर होईल. तेव्हा मात्र नेपाळ–श्रीलंका या देशातील घडून गेलेले आणि घडत असलेले चित्र पाहता आपल्याकडेही महाराष्ट्रासह संपूर्ण देशात अराजकता माजल्याशिवाय राहणार नाही. असेच काहीसे सरकारी आणि सामाजिक चित्र सध्या निर्माण झाले असून येणाऱ्या काळात जी काय परिस्थिती निर्माण होईल याला सरकार आणि सरकारमधील अधिकारी वर्ग जबाबदार असतील हे मात्र निश्चित....!!

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६
FRIDAY, DT.27 NOVEMBER 2026
पान -२
PAGE - 2

संपादकीय....

टंचाई निवारण होणार सुकर

राज्यात 'एल-निनो'च्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई आतापासूनच जाणवत आहे. आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन, टंचाईग्रस्त भागात तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी राज्य शासनाने पाणीपुरवठ्याच्या विविध उपाययोजनांच्या आर्थिक मर्यादेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना विविध पाणीपुरवठा उपाययोजनांसाठी प्रशासकीय मंजुरी देताना वाढीव आर्थिक अधिकार उपलब्ध होणार असून, टंचाई निवारणाच्या कामांना गती मिळणार आहे. याविषयाची माहिती जाणून घेऊ या.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने १८ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादांना ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित मंत्रिमंडळ उपसमितीच्या ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

पाणीटंचाई निवारणासाठी क्षेत्रीय स्तरावर तातडीने निर्णय घेता यावेत आणि प्रशासकीय प्रक्रियेमुळे उपाययोजनांना विलंब होऊ नये, यासाठी शासनाने जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांच्या आर्थिक अधिकारांमध्ये वाढ केली आहे. वाढीव आर्थिक मर्यादेमुळे टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक पाणीपुरवठा सुविधा निर्माण करणे, विद्यमान योजनांची दुरुस्ती करणे आणि पर्यायी व्यवस्था उभारणे अधिक सुलभ होणार आहे.

तात्पुरत्या पूरक नळ योजनांना प्राधान्य

पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्था अपुरी पडत असल्यास, तात्पुरत्या पूरक नळ पाणीपुरवठा योजना उभारण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. अशा योजनांमुळे आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी जलस्रोतांचा वापर करून पाणीपुरवठा व्यवस्था कार्यान्वित करता येईल. या योजनांसाठी जिल्हाधिकारी ४० लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्त १ कोटी रुपयांपर्यंत प्रशासकीय मंजुरी देऊ शकतील.

नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीला गती

ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा योजना अस्तित्वात असल्या, तरी तांत्रिक बिघाड, पाइपलाइनमधील गळती, पंप यंत्रणेतील दोष किंवा अन्य कारणांमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होतो. अशा योजनांची विशेष दुरुस्ती वेळेत झाल्यास उपलब्ध जलस्रोतांचा अधिक प्रभावी वापर करता येईल आणि गावांमधील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होईल.

या विशेष दुरुस्ती कामांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना ६० लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्तांना १ कोटी रुपयांपर्यंत आर्थिक मंजुरीचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे बंद पडलेल्या किंवा अपुऱ्या क्षमतेने सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीला गती मिळणार आहे.

टँकरसाठी हायड्रंटची व्यवस्था

टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना टँकर भरण्यासाठी योग्य ठिकाणी पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक तात्पुरत्या हायड्रंटची व्यवस्था करण्याची तरतूद शासनाने केली आहे. या उपाययोजनेसाठी जिल्हाधिकारी १ लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्त २ लाख रुपयांपर्यंत खर्चास मंजुरी देऊ शकतील. टँकर भरण्याची व्यवस्था सुलभ झाल्यास पाणी वितरण प्रक्रियेतील वेळ कमी होऊन टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा अधिक नियमित करण्यास मदत होईल.

बैलगाडीने पाणीपुरवठ्याचीही तरतूद

दुर्गम भागातील वाड्या-वस्त्यांमध्ये, जेथे टँकर पोहोचणे कठीण आहे किंवा अन्य पर्याय उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी बैलगाडीने पाणीपुरवठा करण्याची उपाययोजनाही शासन निर्णयात कायम ठेवण्यात आली आहे. यासाठी प्रति दिन, प्रति बैलगाडी ३ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पिण्याचे पाणी पोहोचविण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार या पर्यायाचा वापर करता येणार आहे.

टंचाई निवारणाला बळ

पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यासाठी केवळ दीर्घकालीन जलस्रोत निर्मितीच नव्हे, तर तात्पुरत्या उपाययोजना, विद्यमान योजनांची दुरुस्ती, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि दुर्गम भागांपर्यंत पाणी पोहोचविण्याची व्यवस्था यांचीही आवश्यकता असते. आर्थिक मर्यादेत वाढ केल्यामुळे क्षेत्रीय प्रशासनाला परिस्थितीनुसार अधिक तत्परतेने निर्णय घेता येणार आहे. प्रशासकीय मंजुरीच्या प्रक्रियेत सुलभता निर्माण झाल्यामुळे टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक कामे वेळेत सुरू करण्यास मदत होईल. वाढीव आर्थिक अधिकारांचा प्रभावी वापर, पाणीपुरवठा यंत्रणांचे नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांमधील समन्वयातून ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईच्या काळात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

विकसित मराठवाड्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासावर भर द्यावा - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

महास्ट्राईडच्या आढावा बैठकीत सूचना



छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्याची बलस्थाने आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन जलसंवर्धन, पर्यटन तसेच पायाभूत सुविधांच्या विकासाचे प्रभावी नियोजन करावे. 'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र २०४७' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी विकसित मराठवाडा घडविणे आवश्यक असून, त्यासाठी विविध योजनांची प्रत्यक्ष पातळीवर प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

महास्ट्राईड प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली स्मार्ट सिटी कार्यालय येथे विभागस्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला महास्ट्राईडचे प्रकल्प संचालक अमन मित्तल, जागतिक बँकेच्या टास्क टीम लीडर नेहा गुप्ता, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) संस्थेचे अधिकारी, मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचे जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा धोरणात्मक युनिट पथकांचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी जिल्ह्यांना केंद्रस्थानी ठेवून आर्थिक विकासाला गती देणे आणि सार्वजनिक सेवांचे वितरण अधिक प्रभावी करणे, हा महास्ट्राईड प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी संस्थात्मक यंत्रणा, माहिती व्यवस्थापन, समन्वय आणि संनियंत्रण प्रणाली अधिक सक्षम करण्यासह डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून राज्यस्तरीय नियोजन यंत्रणा बळकट करण्यावर भर देण्यात येत आहे.

मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्याची बलस्थाने आणि स्थानिक गरजांचा सखोल अभ्यास करून मित्र संस्थेच्या सहकार्याने विकासाचे योग्य नियोजन करावे. विभागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलसंवर्धन आणि पाणीपुरवठ्याच्या दीर्घकालीन उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. पर्यटन विकासासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासह नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित पायाभूत सुविधांचा विकास करावा. नियोजन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. मात्र, योजनांची प्रभावी अंमलबजावणी उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातूनच करावी लागणार आहे. त्यामुळे योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. यामध्ये जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले.

बैठकीत सन २०२६-२७ मधील जिल्हा प्रोत्साहन निधीच्या निकषांनुसार जिल्ह्यांची तयारी आणि जिल्हानिहाय पायाभूत माहिती सादर करण्याबाबत आढावा घेण्यात आला. तसेच वार्षिक कृती आराखडा २०२६-२७ आणि जिल्हा धोरणात्मक आराखडा यांच्या अंमलबजावणीची स्थिती, जिल्हानिहाय प्रगती, येणाऱ्या अडचणी तसेच जिल्हा धोरणात्मक युनिटकडून मिळणाऱ्या सहाय्याचा आढावा घेण्यात आला. डेस्टिनेशन मॅनेजमेंट ऑर्गनायझेशनची जिल्ह्यांतील सद्यस्थिती आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या सहाय्याबाबतही चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यांच्या गरजांनुसार विकासाचे प्राधान्यक्रम निश्चित करून योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा सांख्यिकी अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टपूर्तीसाठी विकसित मराठवाडा घडविण्याच्या दिशेने महास्ट्राईड प्रकल्पाच्या माध्यमातून जिल्हास्तरीय नियोजन आणि योजनांची अंमलबजावणी अधिक सक्षम करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

यावेळी महास्ट्राईडचे प्रकल्प संचालक अमन मित्तल आणि जागतिक बँकेच्या टास्क टीम लीडर नेहा गुप्ता यांनी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, हिंगोली आणि नांदेड या आठही जिल्ह्यांतील जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांसमवेत प्रस्तावित एकात्मिक जिल्हा डेटा पोर्टल विकसित करण्याबाबत चर्चा केली. यासाठी जिल्ह्यांतील सध्याच्या माहिती प्रणाली, अहवाल, माहितीतील त्रुटी, जिल्हा निर्देशांक, माहितीचे स्रोत आणि भौगोलिक माहिती प्रणाली विषयक कामांचा आढावा घेण्यात आला. तसेच विकासकामांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

राज्यातील नागरिकांना २६ जानेवारीपर्यंत डिजिटल गव्हर्नन्सचा नवा अनुभव मिळण्यासाठी प्रयत्न करावे- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यातील शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पारदर्शक, गतिमान आणि मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या प्रशासकीय प्रक्रिया पुनर्रचना (जीपीआर) उपक्रमाला अधिक गती द्यावी. येत्या २६ जानेवारीपर्यंत नागरिकांना डिजिटल गव्हर्नन्सचा वेगळा अनुभव देण्याच्या दृष्टीने सर्व विभाग आणि जिल्हा प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

राज्य शासनाच्या १७४ सेवा व प्रकल्पांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे लोकार्पण झाले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री ड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, तसेच समग्र आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गेल्या दीड-दोन वर्षांपासून शासकीय योजना आणि सेवा नागरिकांपर्यंत विनासायास पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व या तीन तत्त्वांच्या



आधारे प्रशासनात परिवर्तन घडविण्याचे उद्दिष्ट आहे. 'झिरो ब्युरोक्रसी' हे आपले ध्येय असून, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करून अनावश्यक टप्पे आणि मानवी हस्तक्षेप कमी करण्यावर भर देण्यात येत आहे.

राज्यातील १,१२९ प्रशासकीय प्रक्रिया पुनर्रचनेच्या उद्दिष्टांपैकी आतापर्यंत ३९७ प्रक्रिया पूर्ण झाल्या असून, सुमारे ३५ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. याअंतर्गत १७४ सेवांचे डिजिटल प्लॅटफॉर्मवर लोकार्पण करण्यात आले आहे. त्यामध्ये मैत्री २.० प्लॅटफॉर्मवरील ७६, आपले सरकार २.० वरील ७४ आणि थेट लाभ हस्तांतरण (महाडीबीटी २.०) अंतर्गत २४ सेवांचा समावेश आहे.

महासारथी हा डेटा आधारित प्रशासनासाठी महत्त्वाचा प्लॅटफॉर्म ठरणार असून, विविध शासकीय योजनांची अचूकता आणि सेवा वितरणाची कार्यक्षमता वाढविण्यास त्याचा उपयोग होईल. उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेनंतर संबंधित विभागांकडून शासन निर्णय निर्गमित करणे, त्यानंतर डिजिटल आर्किटेक्चर आणि सेवा उपयोगाच्या प्रक्रिया विकसित करणे, अशी निश्चित कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे. तसेच आतापर्यंत ७२९ शासन निर्णय निर्गमित झाले आहेत. तसेच सुमारे ३५० सेवांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे.

येत्या २४ डिसेंबरपर्यंत आणखी काही महत्त्वाच्या सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे प्रलंबित मान्यता आणि तांत्रिक बाबींना प्राधान्य देऊन ३१ डिसेंबरपर्यंत आवश्यक तांत्रिक कामे पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

डिजिटल सेवांमुळे कागदपत्रांचा भार कमी होणार

डिजिटल गव्हर्नन्सच्या माध्यमातून अनावश्यक प्रतिज्ञापत्रे रद्द करणे, नागरिकांकडून वारंवार मागितली जाणारी कागदपत्रे कमी करणे आणि पेपरलेस गव्हर्नन्सकडे वाटचाल करणे शक्य होणार आहे. यासाठी केंद्रांचे सक्षमीकरण, नियमित देखरेख आणि तक्रार निवारणावर विशेष लक्ष द्यावे. जिल्हाधिकारी आणि जिल्हास्तरीय यंत्रणांनी यामध्ये सक्रिय भूमिका बजावावी, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आज आरटीएस २.०, महाडीबीटी २.०, मैत्री २.०, महाउपलब्धी, राज्य-केंद्र शासन पत्रव्यवहार व्यवस्थापन प्रणाली, शासकीय निवासस्थान वाटप व्यवस्थापन प्रणाली आणि महाराष्ट्र आधार डॅशबोर्ड अशा विविध डिजिटल प्रणालींचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.महाउपलब्धी या प्रणालीच्या माध्यमातून निवृत्तीवेतनधारक आणि विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मोबाईलवरच डिजिटल जीवन प्रमाणपत्र तयार करता येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहून आपण हयात असल्याचे प्रमाणित करण्याची आवश्यकता कमी होणार आहे. केंद्र शासनाशी होणारा पत्रव्यवहार आणि त्यावरील कार्यवाहीचा मागोवा घेण्यासाठी विकसित करण्यात आलेली प्रणालीही महत्त्वपूर्ण ठरेल. तसेच शासकीय निवासस्थानांच्या वाटपात पारदर्शकता आणणे आणि आधारशी संबंधित सेवांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी नवीन प्रणालींचा उपयोग होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

बीड येथील खेलो इंडिया कबड्डी

केंद्रासाठी १ डिसेंबर रोजी निवड चाचणी

बीड ।प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या खेलो इंडिया योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या जिल्हास्तर कबड्डी प्रशिक्षण केंद्राच्या प्रवेशासाठी मंगळवार, दि. १ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलात ही चाचणी पार पडणार असून १२ वर्षांखालील मुला-मुलींनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

देशातील विविध जिल्ह्यांमध्ये पुढील चार वर्षांत एक हजार खेलो इंडिया केंद्रे उभारण्यात येत असून या अंतर्गत बीडला कबड्डी केंद्राची मान्यता मिळाली आहे. जिल्ह्यातील उत्कृष्ट १५ मुले आणि १५ मुली खेळाडूंची तज्ञ निवड समितीमार्फत निवड करून त्यांना तंत्रशुद्ध प्रशिक्षण देणे आणि प्रतिभावान खेळाडू घडवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. हे प्रशिक्षण पूर्णपणे अनिवासी स्वरूपाचे असून, निवड झालेल्या खेळाडूंना दररोज सकाळी व सायंकाळी तज्ञ प्रशिक्षकांद्वारे मार्गदर्शन केले जाईल. खेळाडूंची शारीरिक क्षमता तपासण्यासाठी एकूण ९ प्रकारच्या चाचण्या घेतल्या जाणार असून, यातील गुणानुक्रमे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची अंतिम निवड होईल. विहित नमुन्यातील अर्ज, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधारकार्ड आणि जन्म तारखेचा मूळ दाखला व त्यांच्या दोन सत्यप्रती चाचणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांशिवाय चाचणीत प्रवेश दिला जाणार नाही. अधिक माहितीसाठी इच्छुक खेळाडू व पालकांनी कार्यालयीन वेळेत क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार (मो. ९०७५४७६७९१) किंवा सतीश राठोड (मो. ९९२३०१९३५३) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

नागपूर येथे सब-ज्युनिअर राज्यस्तरीय वुशु निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने २०२६-२७ या वर्षातील २३ व्या सब-ज्युनिअर राज्यस्तरीय वुशु निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा येत्या दि.३० नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर येथील तालुका क्रीडा संकुल, कोराडी येथे पार पडणार आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

सर्व सहभागी संघ, खेळाडू आणि पंचांनी सकाळी ८ वाजेपर्यंत स्पर्धा स्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सकाळी ८ ते १० या वेळेत खेळाडूंचे वजन आणि तांत्रिक समितीची बैठक होईल. सकाळी ११ वाजता स्पर्धेचा उद्घाटन सोहळा संपन्न होईल. त्यानंतर सकाळी ११:३० वाजल्यापासून सांडा आणि पारंपरिक कुंग फू या दोन्ही क्रीडा प्रकारांतील प्रत्यक्ष सामन्यांना सुरुवात होईल. सायंकाळी ६ ते ७ या वेळेत बक्षीस वितरण व समारोप सोहळा होऊन सर्व संघ रवाना होतील. या राज्यस्तरीय निवड चाचणीतील प्रत्येक खेळ आणि वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंची आगामी २६ व्या राष्ट्रीय सब-ज्युनिअर वुशु (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ साठी महाराष्ट्र राज्याच्या अधिकृत संघात निवड केली जाणार आहे. असे कळविले आहे.

ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल बेरोजगार युवक-युवतींसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे विशेष शिबिर

छत्रपती संभाजीनगर येथे २८ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन ; सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत लाभ घेता येणार

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ : ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळामार्फत छत्रपती संभाजीनगर येथे शनिवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत हे शिबिर होणार आहे. या शिबिरात महामंडळाच्या विविध कर्ज व्याज परतावा योजनांची माहिती देण्यासह पात्र लाभार्थ्यांचे अर्ज प्रत्यक्ष स्वीकारण्यात येणार आहेत.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना' आणि 'गट कर्ज व्याज परतावा योजना' या योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, तसेच अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे.

'वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजने'अंतर्गत बँकेकडून घेतलेल्या कर्जावर नियमित परतफेड केल्यास बँकेच्या व्याजदराच्या किंवा १२ टक्के यांपैकी कमी असलेल्या दराने, कमाल सात वर्षांच्या कालावधीसाठी व्याज परतावा देण्यात येणार आहे. पाच लाख रुपयांच्या कर्जासाठी कमाल १.७० लाख रुपये, दहा लाख रुपयांच्या कर्जासाठी कमाल तीन लाख रुपये आणि पंधरा लाख रुपयांच्या कर्जासाठी कमाल ४.५० लाख रुपयांपर्यंत व्याज परताव्याची तरतूद आहे.

'गट कर्ज व्याज परतावा योजने'अंतर्गत दोन किंवा अधिक व्यक्तींच्या गटाने राष्ट्रीयीकृत, खासगी अथवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कमाल ५० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर नियमित परतफेड केल्यास व्याज परतावा देण्यात येणार आहे. तसेच पाच किंवा त्यापेक्षा अधिक सदस्यांच्या गटाला कमाल १५ लाख रुपयांपर्यंत व्याज परतावा मिळण्याची तरतूद आहे.

अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आणि ब्राह्मण समाजातील असावा. वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे असून, अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या आत असणे आवश्यक आहे. महिलांसाठी ३० टक्के, तर दिव्यांगांसाठी तीन टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

अर्ज प्रक्रिया ऑनलाइन अथवा ऑफलाइन स्वरूपाची असून, अर्जदाराने प्रथम महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे. ज्या लाभार्थ्यांनी शिबिरापूर्वी संकेतस्थळावर नोंदणी केली आहे, त्यांनी शिबिरात अर्ज सादर करावेत. शिबिरात योजनांची सविस्तर माहिती व अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना ३ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. महामंडळाचे मुख्यालय पुणे येथे असून, अध्यक्षपदी कॅप्टन श्री. आशीष दामले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना मंत्री दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
वेचक वृत्त
शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६
FRIDAY, DT.27 NOVEMBER 2026
पान -३
PAGE - 3

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घ्या-अशोक लोढा

२६ नोव्हेंबरपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगाराची संधी

चौसाळा/ प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी, पशुपालक, ग्रामीण महिला तसेच बेरोजगार युवक-युवतींना पशुपालनाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी दि. २६ नोव्हेंबर पासून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होत असून, बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकरी, पशुपालक आणि युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जि.

सदस्य तथा भारतीय जनता पार्टीचे बीड शहराध्यक्ष अशोक चांदमल लोढा यांनी केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून ग्रामीण भागातील पशुपालन व्यवसायाला आधुनिक स्वरूप देण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करणे, शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे अतिरिक्त स्रोत निर्माण करणे आणि पशुधनावर आधारित उद्योगांना चालना देणे, या उद्देशाने ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या योजनेच्या माध्यमातून गाय-म्हैस पालन, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन यांसारख्या व्यवसायांना शासनाच्या नियमानुसार अनुदानाचा लाभ मिळणार असून, पशुधनासाठी शेड तसेच आधुनिक चारा व्यवस्थेसारख्या सुविधांनाही प्रोत्साहन मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी केवळ शेती उत्पादन वाढविणे पुरेसे नसून शेतीशी संबंधित पूरक पूरक व्यवसायांनाही प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. दुग्धव्यवसायातून नियमित उत्पन्न मिळविण्याची संधी उपलब्ध होते, तर शेळी- मेंढी पालन, कुक्कुटपालन आणि इतर पशुपालन व्यवसायांमधूनही शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार मिळू शकतो. ग्रामीण भागातील युवकांनी नोकरीच्या शोधात शहरांकडे जाण्याऐवजी गावातच स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी अशा योजनांचा लाभ घेणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि पशुसंवर्धन



मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व युवकांना उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल, असे अशोक लोढा यांनी सांगितले

कालिकादेवी विद्यालयात, संविधान दिन उत्साहात साजरा

शिरूर (का.)प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर



(का.)जि.बीड येथे 'भारतीय संविधान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब व श्री अजिंक्य चांदणे सर यांच्या हस्ते, भारतीय संविधानाचे शिल्पकार, 'भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी 'संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन' करण्यात आले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक सिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा.संजय काकडे, प्रा.नामदेव तरकसे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड,प्रा.नितीन भोसले, प्रा.बिभिषण घायाळ, डॉ.आत्माराम झिंजुर्डे, प्रा.विश्वास ढाकणे,प्रा.विनोद गलांडे,प्रा.नारायण तांबे, प्रा.महादेव हांगे,प्रा.रवींद्र संकपाळे, प्रा.नारायण घोलप, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.अशोक घोडके, प्रा.दत्ता शिंदे, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.हनुमंत घायाळ प्रा.शशिकांत जावळे, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे, विनायक सुरवसे, आप्पासाहेब कांबळे, राजू बडे, जयेंद्र निकम, संतोष चौधरी, रवी जोशी, नितीन बहिर,रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, नंदकुमार जाधव, विलास कांबळे, गौतम भोसले, तसेच विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्राहक पंचायतच्या पाठपुराव्याला यश

आयडीबीआयच्या १० हजार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मार्ग मोकळा

जालना ।प्रतिनिधी

आयडीबीआय बँकेच्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक घडामोड समोर आली आहे.अखिल भारतीय ग्राहक पंचायतने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळण्याची चिन्हे असून मराठवाड्यातील आयडीबीआय बँकेच्या सुमारे १० हजार थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत पात्र शेतकऱ्यांच्या याद्या कर्जमाफी प्रक्रियेसाठी अपलोड करण्याचे आदेश आयडीबीआय बँकेच्या मराठवाडा विभागीय व्यवस्थापकांना दिल्याची माहिती आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांच्या कर्जमाफीची प्रक्रिया सुरू असताना आयडीबीआय, एचडीएफसी आणि आयसीआयसीआय यांसारख्या खासगी बँकांमधून पीककर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांमध्ये मात्र संभ्रमाचे वातावरण होते. शासनाच्या कर्जमाफीच्या निर्णयाचा लाभ खासगी बँकांच्या पात्र कर्जदारांनाही मिळणार की नाही असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला होता. विशेषत जालना जिल्ह्यातील अंबड,घनसावंगी आणि परिसरातील आयडीबीआय बँकेचे कर्जदार शेतकरी या प्रश्नामुळे अडचणीत आले होते.या अन्यायकारक परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश तारगे यांनी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे उपविभागीय अधिकारी, अंबड यांच्यामार्फत निवेदन सादर करून खासगी बँकांच्या पात्र शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच संबंधित बँकांकडून पात्र लाभार्थ्यांची माहिती तातडीने शासनाकडे मागविण्याची मागणीही करण्यात आली होती.या निवेदनाची सहकार विभागाने दखल घेतली असून सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील यांनी आयडीबीआय बँकेचे मराठवाडा विभागीय व्यवस्थापक निखिलेश पाटणकर यांच्याकडून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या कर्जमाफी प्रक्रियेसाठी अपलोड करण्याबाबत निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे.विशेष म्हणजे या प्रकरणाच्या अनुषंगाने सहकार विभागाच्या कार्यालयातून दोन वेळा डॉ. रमेश तारगे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्यात आला. जालना जिल्ह्यातील आयडीबीआय बँकेच्या कर्जदार शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाशी संपर्क साधून वरिष्ठ स्तरावर आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचेही त्यांना कळविण्यात आले.केवळ याद्या अपलोड करून चालणार नाही. मराठवाड्यातील सुमारे दहा हजार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी याद्या अपलोड करण्याच्या हालचाली सुरू झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र ही प्रक्रिया केवळ कागदोपत्री न राहता पात्र शेतकऱ्यांची पडताळणी, कर्जमाफीची अंतिम मंजुरी आणि प्रत्यक्ष लाभाची रक्कम संबंधित कर्जखात्यात जमा होईपर्यंत प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जालना जिल्ह्यातील आयडीबीआय बँकेच्या सर्व पात्र कर्जदार शेतकऱ्यांची माहिती तातडीने संकलित करून शासनाकडे पाठवावी आणि कर्जमाफीची प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावी अशी मागणी डॉ. रमेश तारगे यांनी केली आहे.शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर ग्राहक पंचायतने केलेल्या पाठपुराव्याला सहकार विभागाकडून मिळालेला प्रतिसाद महत्त्वपूर्ण मानला जात आहे. मात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ जमा होईपर्यंत संघटनेचा पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे डॉ.तारगे यांनी स्पष्ट केले.



संविधानाचा जागर, मुलांचा उत्साह.!

भोकरदन येथे अलहुदा शाळेच्या वतीने भव्य संविधान रॅली

भोकरदन / इसरारखान पठाण

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून भोकरदन येथील अलहुदा उर्दू शाळेच्या वतीने भव्य संविधान रॅली मोठ्या उत्साहात काढण्यात आली. या रॅलीमध्ये शाळेतील सर्व मुलं आणि मुली यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

आम्ही भारताचे लोक... च्या घोषणा देत संपूर्ण भोकरदन शहर दुमदुमून गेले.या संविधान रॅलीची सुरुवात शाळेपासून झाली. रॅली सराफा मार्केट, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बस स्टँड मार्गे परत अलहुदा शाळेपर्यंत काढण्यात आली.हातात संविधानाच्या उद्देशिकेचे फलक, तिरंगा आणि घोषणांचे फलक घेऊन लहान-लहान विद्यार्थी मोठ्या शिस्तीत चालत होते. रॅली बघण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी केली होती.या संविधान रॅलीचे अध्यक्ष शब्बीर कुरेशी साहेब, संस्थापक अध्यक्ष, अलहुदा उर्दू स्कूल हे होते.त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वाखाली ही रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षिका ही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.उर्दू शाळेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर चांगले नियोजन करून ही संविधान रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, त्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये समजावीत, हा या रॅलीमागचा मुख्य उद्देश होता.लहान वयातच संविधानाबद्दल आदर आणि अभिमान निर्माण व्हावा, यासाठी शाळेने घेतलेला हा पुढाकार सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११३३/२०२६

इंदुबाई वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

(मार्फत ॲड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **इंदुबाई भ्र.सुखदेव माने, रा.महांडुळा, ता.गेवराई, जि. बीड ह.मु.बालमटाकळी, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, महांडुळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या पती नामे सुखदेव पि.शंकर माने यांच्या दि.२१/०८/२००५ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २०/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २४/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९५०/२०२६

उर्मीला भ्र. केशव खनपीट व इतर वि. निरंक

(मार्फत ॲड. पी.पी.रुईकर)

ज्याअर्थी मयत नामे **केशव मनोहर खनपीट**, हे / हया दिनांक **१९/०७/२०२६** रोजी **भोजगाव, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ उर्मीला भ्र. केशव खनपीट, वय ४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.भोजगाव, ता. गेवराई जि. बीड

२ प्रतिक पि. केशव खनपीट, वय २० वर्षे, धंदा-शिक्षण व शेती, रा.भोजगाव, ता. गेवराई जि. बीड

३ सत्यभामा भ्र.मनोहर खनपीट, वय ७५ वर्षे, धंदा-घरकाम, रा.भोजगाव, ता. गेवराई जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १५/१२/२०२६

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०६०/२०२६

मंगल भ्र.रमेश सोनवणे व इतर वि. निरंक

(मार्फत ॲड. एस.एल.कदम)

ज्याअर्थी मयत नामे **रमेश भगवान सोनवणे** हे / हया दिनांक **०९/१०/२०२६** रोजी **निपाणी जवळका, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ मंगल भ्र.रमेश सोनवणे, वय ५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा.निपाणी जवळका, ता. गेवराई, जि. बीड

२ विठ्ठल पि.रमेश सोनवणे, वय ३५ वर्षे, धंदा-शेती, रा.निपाणी जवळका, ता. गेवराई, जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०५/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. एच.एम.मोमीन सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०६७/२०२६

पद्माबाई व इतर वि. निरंक

(मार्फत ॲड. एस.एस.काळे)

ज्याअर्थी मयत नामे **कोंडीराम पि.रंभाजी तळेकर**, हे / हया दिनांक **२१/०१/२०२५** रोजी **मौजे मादळमोही, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ पद्माबाई भ्र.कोंडीराम तळेकर, वय ७८ वर्षे, धंदा-सुखवस्तू, रा.मादळमोही, ता. गेवराई जि. बीड

२ विश्वंभर पि.कोंडीराम तळेकर, वय ५४ वर्षे, धंदा-शेती, रा.मादळमोही, ता. गेवराई जि. बीड

३ शोभा भ्र.राजेंद्र जाधव, वय ४८ वर्षे, धंदा-शेती, रा.भोगलगांव, ता. गेवराई जि. बीड

४ रुक्मीण भ्र.बाबासाहेब जाधव, वय ४६ वर्षे, धंदा-शेती, रा.भोगलगांव, ता. गेवराई, जि. बीड

५ मिना भ्र.बप्पासाहेब मोरे, वय ४२ वर्षे, धंदा-शेती, रा.तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०२/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. एच.एम.मोमीन सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०६५/२०२६

नवनाथ व इतर वि. निरंक

(मार्फत ॲड. एस.डी.सानप)

ज्याअर्थी मयत नामे **नारायण पि.संतु उर्फ संतराम बोंदरे** हे / हया दिनांक **२९/०६/२०२६** रोजी **मौजे रोहीतळ, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ नवनाथ पि.नारायण बोंदरे, वय ५० वर्षे, धंदा-शेती, रा. रोहीतळ, ता. गेवराई, जि. बीड

२ निलावती भ्र.नारायण बोंदरे, वय ७५ वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. रोहीतळ, ता. गेवराई, जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०२/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०५६/२०२६

मीनाबाई भ्र.सदानंद धुर्वे व इतर वि. निरंक

(मार्फत ॲड. जी.आर. शेंबडे)

ज्याअर्थी मयत नामे **सदानंद पि.भगवान धुर्वे**, हे / हया दिनांक **२७/०३/२०२५** रोजी **खेर्डा बु., ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ मीनाबाई भ्र.सदानंद धुर्वे, वय ५३ वर्षे, धंदा-शेती, रा.खेर्डा बु. पो.भेंडटाकळी, ता. गेवराई जि. बीड

२ ज्ञानेश्वर पि.सदानंद धुर्वे, वय ३६ वर्षे, धंदा-शेती, रा.खेर्डा बु. पो.भेंडटाकळी, ता. गेवराई जि. बीड

३ सर्वज्ञ पि.सदानंद धुर्वे, वय १८ वर्षे, धंदा-शेती, रा.खेर्डा बु. पो.भेंडटाकळी, ता. गेवराई जि. बीड

४ मुक्ता भ्र.प्रविण घोडके, वय ३३ वर्षे, धंदा-घरकाम, धाराशिव, ता.जि. धाराशिव

५ ज्योती भ्र.तुकाराम कानडे, वय २७ वर्षे, धंदा-घरकाम, रा.शिराळा, ता. परांडा, जि. धाराशिव

६ अर्चना भ्र. दिलीप गवळी, वय २४ वर्षे, धंदा-घरकाम, रा.नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलढाणा

७ वैष्णवी भ्र.रोहीत आडसुळ, वय २१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.उंबरे कोटा. धाराशिव, ता.जि. धाराशिव

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०७/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०७२/२०२६

वर्षा भ्र.ईश्वर धावडे व इतर वि. निरंक

(मार्फत ॲड. आय.एस.धापसे)

ज्याअर्थी मयत नामे **शिवनाथ पि.बाबुराव काटकर**, हे / हया दिनांक **१५/०१/२०२२** रोजी **तळणेवाडी, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ वर्षा भ्र.ईश्वर धावडे, वय २९ वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. टेंबी आंतरवाली, ता. घनसांगवी, जि. जालना,

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०७/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

विविध वृत्त

शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६
FRIDAY, DT.27 NOVEMBER 2026

पान -४
PAGE - 4

अनाथांचा नाथ.. दुष्काळग्रस्त शेतकरी रिक्षा सन्मान योजनेंतर्गत

पाच वर्षांत १ लाख रिक्षांचे वाटप होणार -परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या हाताला मिळणार रोजगाराचे नवे साधन

मुंबई ।प्रतिनिधी

निसर्गाची अनियमितता, सततची दुष्काळी परिस्थिती, शेतीमालाला मिळणारा कमी बाजारभाव आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना आता उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध करून देण्याच्या दिशेने राज्य शासनाने महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शेतीवरील आर्थिक अवलंबित्व कमी करून शेतकऱ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढील पाच वर्षांत (२०२७ ते २०३१) अनाथांचा नाथ.. दुष्काळग्रस्त शेतकरी रिक्षा सन्मान योजनेंतर्गत तब्बल १ लाख प्रवासी ऑटो रिक्षांचे वाटप करण्याची महत्वाकांक्षी योजना लागू करण्यात येत असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली.

९ फेब्रुवारी ला पात्र शेतकऱ्यांना रिक्षाची चावी दिली जाईल...

पुढील वर्षी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवशी म्हणजे ९ फेब्रुवारी २०२७ रोजी पात्र शेतकऱ्यांना रिक्षाची चावी देण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सहकार्याने राज्य शासनाच्या परिवहन विभाग आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळामार्फत 'अनाथांचा नाथ दुष्काळग्रस्त शेतकरी रिक्षा सन्मान योजना' राबविण्यात येणार असून, या योजनेचा लाभ दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी कुटुंबांना मिळणार आहे.

या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे रिक्षा खरेदीसाठी लाभार्थ्यांना वाहनांच्या एकुण किंमतीच्या १० टक्के रक्कम कल्याणकारी मंडळाच्या वतीने अनुदान स्वरूपात उभी करण्यात येणार असून, उर्वरित ९० टक्के रक्कम राष्ट्रीयीकृत बँका, अनुसूचित बँका किंवा अन्य वित्तीय संस्थांच्या माध्यमातून कर्जस्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी कुटुंबांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळणार आहे.

पहिल्या वर्षी २० हजार शेतकऱ्यांना लाभ..

या योजनेअंतर्गत पहिल्या वर्षात शासनाने दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या ३१० किंवा भविष्यात वाढणाऱ्या तालुक्यांमधील एकूण २० हजार पात्र शेतकरी लाभार्थ्यांना रिक्षांचे वाटप करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. प्रत्येक तालुक्यात सरासरी ६० लाभार्थ्यांना रिक्षा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. एखाद्या तालुक्यात पात्र लाभार्थ्यांची संख्या निश्चित उद्दिष्टापेक्षा कमी असल्यास उर्वरित रिक्षांचे वाटप त्याच जिल्ह्यातील अन्य तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना आर्थिक स्वावलंबनाची संधी..

या योजनेचा मुख्य उद्देश केवळ वाहनांचे वाटप करणे हा नसून, शेतीला पूरक उत्पन्नाचे साधन निर्माण करून शेतकरी कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे हा आहे. रिक्षा व्यवसायाच्या माध्यमातून नियमित उत्पन्न मिळविण्याची संधी उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण आणि निमशहरी भागात स्वयंरोजगाराला चालना मिळणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शेतीतील अनिश्चिततेवर मात करण्यासाठी उत्पन्नाचा पर्यायी स्रोत उपलब्ध होणार आहे.

लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड..

योजनेसाठी मंडळामार्फत जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागविण्यात येतील. प्राप्त अर्जांची कागदपत्रांच्या आधारे छाननी करून पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर संगणकीय लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव बँकांकडे कर्जमंजुरीसाठी पाठविण्यात येतील. बँकेकडून वाहनांच्या एकुण किंमतीच्या ९० टक्के कर्ज मंजूर झाल्यानंतर मंडळाकडून १० टक्के अनुदान उपलब्ध करून दिले जाईल. वाहन खरेदीची रक्कम थेट अधिकृत वाहन विक्रेत्याला अदा करण्यात येईल.

योजनेच्या लाभासाठी प्रमुख अटी...

लाभार्थी हा दुष्काळग्रस्त क्षेत्रातील अल्प किंवा अत्यल्प भूधारक शेतकरी अथवा शेतकरी कुटुंबातील पात्र सदस्य असणे आवश्यक आहे. संबंधित शेतकरी कुटुंबाच्या नावावर शेती असल्याचा पुरावा सादर करावा लागेल. यापूर्वी याच स्वरूपाच्या शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा. तसेच वाहन चालविण्याचा वैध परवाना किंवा नियमानुसार तो प्राप्त करण्याची पात्रता असणे आवश्यक राहील. बँकेच्या कर्जमंजुरीच्या अटींची पूर्तता करणेही बंधनकारक असेल.

या योजनेचा आर्थिक भार कल्याणकारी मंडळावर मर्यादित राहणार असून, कल्याणकारी मंडळाच्या मर्यादित निधीतून अधिकाधिक शेतकरी कुटुंबांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

एकंदरीत, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदत देण्याऐवजी त्यांच्या हाताला रोजगार आणि कुटुंबाला उत्पन्नाचे शाश्वत साधन उपलब्ध करून देण्याचा या योजनेमागील प्रयत्न आहे. ही योजना प्रत्यक्षात आल्यास राज्यातील हजारो शेतकरी कुटुंबांसाठी आर्थिक स्वावलंबनाच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरणार आहे.



अंबड वकील संघात संविधान दिन उत्साहात साजरा.!

अंबड ।प्रतिनिधी

भारतीय लोकशाहीचा भक्कम पाया असलेल्या संविधानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अंबड वकील संघाच्या वतीने गुरुवार दि. २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अंबड वकील संघाच्या वतीने अँड. पाटील व अँड. तुपे यांच्या हस्ते भारतीय संविधानाची प्रतिमा तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाला अंबड वकील संघाचे अध्यक्ष अँड. ज्ञानेश मुंडे, माजी अध्यक्ष अँड. केदार कुलकर्णी,अँड. दीपाताई गायकवाड आणि अँड.स्नेहल पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अँड. शेळके यांनी भारतीय संविधानाच्या महत्त्वावर सविस्तर मार्गदर्शन केले. संविधानाने प्रत्येक नागरिकाला बहाल केलेले मूलभूत अधिकार नागरिकांची कर्तव्ये,समानता,स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या संविधानिक मूल्यांचे महत्त्व त्यांनी विशद केले.लोकशाही व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी संविधानाचे पालन आणि त्यातील मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.दरम्यान २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर शहीद जवानांना व निष्पाप नागरिकांना यावेळी भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड.कृष्णा साबळे यांनी केले तर अंबड वकील संघाचे सचिव अँड. श्रीकांत काळबांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमाला अंबड वकील संघाचे सर्व वकील बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संविधानिक मूल्यांची जपणूक लोकशाहीवरील निष्ठा आणि न्यायव्यवस्थेप्रती बांधिलकी जपण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

पत्रकारांवरील दडपशाहीच्या निषेधार्थ निदर्शने.!

आ. विजयसिंह पंडित यांच्या नगरसेविका पतीने पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी प्रकरणी सखोल चौकशी करून कारवाईची मागणी - डॉ. गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

लोकप्रतिनिधींच्या विरोधात बातमी प्रसिद्ध केल्याचा राग मनात धरून साप्ताहिक 'प्रातः विचार'चे संपादक शेख काशेफ अब्दुल हक यांना फोनवरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत ट्रकखाली चिरडून मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तसेच बीडमधील पत्रकारांविषयी आक्षेपार्ह भाषा वापरत त्यांच्या विरोधात बातम्या प्रसिद्ध करण्याचे धाडस पत्रकारांमध्ये नसल्याची दमबाजी केल्याचा आरोप आहे. या प्रकाराच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे महाराष्ट्र राज्य मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी बशीरगंज चौक येथे निदर्शने करण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार विजयसिंह पंडित यांना निवेदन देण्यात आले. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार जागे व्हा, आ.विजयसिंह पंडीत जागे व्हा, पत्रकारांवरील दडपशाहीचा धिक्कार असो अशी घोषणाबाजी



करण्यात आली.यावेळी आंदोलनात साप्ताहिक प्रात:विचारचे संपादक शेख काशेफ,शेख युनुस च-हाटकर, सर्फराज पठाण,मुबीन शेख, रामनाथ खोड, माऊली शिंदे, शेख दानिश ,शेख ईमरान,रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड), सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, प्राचार्य डी.जी.तांदळे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ.संजय तांदळे, प्रविण आनेराव (जिल्हाध्यक्ष मायक्रो ओबीसी बीड) आदी सहभागी होते.

बातमी प्रसिद्ध केल्याचा राग

फोनवरून धमकी दिल्याचा आरोप.!

साप्ताहिक 'प्रातः विचार'चे संपादक शेख काशेफ अब्दुल हक यांनी दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या अंकात 'विजयराजेंना क्रिकेटचा सामना पाहायला वेळ! पण ऊसतोड मजूर आरिफ शेख यांच्या न्यायाच्या मोर्चासाठी वेळ नाही? नगरसेवकांच्या राजकारणात व्यस्त; गरीबांच्या न्यायासाठी मात्र गायब?' या आशयाची बातमी प्रसिद्ध केली होती.

या बातमीच्या अनुषंगाने दि. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास प्रभाग क्रमांक १७ मधील महिला नगरसेविकेचे पती शेख बिलाल शेख मंजूर यांनी आपल्या मोबाईलवरून संपादक शेख काशेफ यांना फोन केला. आमदार विजयराजे पंडित व नगरसेवकांविरोधात बातमी का प्रसिद्ध केली, असा जाब विचारत ट्रकखाली मारून टाकण्याची धमकी दिली आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यात आली आहे.

बीड मधील पत्रकारांना आव्हान

बीडमधील पत्रकारांविषयीही अपशब्द वापरत, माझ्याविरोधात बातम्या प्रसिद्ध करण्याची पत्रकारांमध्ये हिंमत नाही, अशा स्वरूपाची दमबाजी केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला..

पत्रकारांनी लोकहिताच्या प्रश्नांवर बातम्या प्रसिद्ध केल्यास त्यांना धमकावणे, शिवीगाळ करणे आणि जीवे मारण्याची भाषा वापरणे हा पत्रकारितेच्या स्वातंत्र्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. पत्रकारांना निर्भयपणे काम करता यावे, यासाठी प्रशासनाने अशा प्रकारांची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.संबंधित प्रकरणातील फोन संभाषण, उपलब्ध पुरावे आणि तक्रारीची पडताळणी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच संबंधित पत्रकारांना संरक्षण द्यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

आ.विजयसिंह पंडित यांच्या विषयी दैनिकात बातमी प्रसिद्ध केल्यावरून साप्ताहिक प्रांत:विचार चे संपादक शेख काशेफ यांना नगरसेवक पतीने जीवे मारण्याची धमकी देत बीड मधील पत्रकारांबाबत आक्षेपार्ह विधान केल्याने आ.विजयसिंह पंडित यांनी नगरसेवकाला कठोर भाषेत समज द्यावी असे म्हटले आहे.



गेवराई:तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते. यावेळी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

अंबडमध्ये सर्वे नं.८ मधील अतिक्रमणावर नगरपरिषदेचा हातोडा

पोलीस बंदोबस्तात अनधिकृत अतिक्रमण हटविले नोटीस देऊनही मालकी हक्काची कागदपत्रे सादर न केल्याने प्रशासनाची कारवाई

अंबड ।प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद प्रशासनाने शहरातील सर्वे नंबर ८ मधील अनधिकृत अतिक्रमणाविरोधात गुरुवारी दि.२६ नोव्हेंबर धडक कारवाई करत अतिक्रमण हटविले. पोलीस प्रशासनाच्या मदतीने करण्यात आलेल्या या कारवाईमुळे अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली असून नगरपरिषदेच्या या कारवाईची शहरात चर्चा सुरू झाली आहे.

अंबड नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ८ मधील जागेवर झालेल्या अतिक्रमणाचा प्रश्न भटके-विमुक्त श्रीनाथ गोसावी सेवा संस्था अंबड यांनी उपस्थित केला होता. संस्थेचे उपाध्यक्ष व सदस्यांनी संस्थेच्या ठरावानुसार संबंधित जागेवरील अतिक्रमण हटविण्याची लेखी मागणी नगरपरिषद प्रशासनाकडे केली होती.या निवेदनाची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान अतिक्रमण आढळून आल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ एमआरटीपी क्ट मधील तरतुदींनुसार संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या. तसेच जागेवरील मालकी हक्क सिद्ध करणारी वैध कायदेशीर कागदपत्रे विहित मुदतीत नगरपरिषद कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.मात्र नोटीस देऊनही विहित मुदत संपेपर्यंत एकाही संबंधित अतिक्रमणधारकाने जागेवरील मालकी हक्क सिद्ध करणारी कागदपत्रे नगरपरिषद प्रशासनाकडे सादर केली नाहीत.त्यानंतर प्रशासनाने उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करून गुरुवारी प्रत्यक्ष कारवाईचा निर्णय घेतला.अखेर गुरुवारी नगरपरिषद अंबड प्रशासनाने पोलीस प्रशासनाच्या मदतीने सर्वे नंबर ८ मधील अनधिकृत अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविली.या कारवाईमुळे शहरातील अतिक्रमणाच्या प्रश्नावर प्रशासनाने ठोस पाऊल उचलल्याचे दिसून आले.अतिक्रमणाविरोधात प्रशासनाची भूमिका स्पष्ट शहरातील सार्वजनिक जागा शासकीय जागा तसेच नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमणांचे प्रश्न मार्गी लावताना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कारवाई करणे आवश्यक आहे. सर्वे नंबर ८ मधील कारवाईच्या निमित्ताने अंबड नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमणाच्या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.



पक्षभेद विसरून सर्वांना सोबत घ्या विकासकामांना गती द्या

महापौर वंदनाताई मगरे यांना माजी नगराध्यक्ष भास्कर‌राव अंबेकर यांचा अनुभवाचा सल्ला मोदीखाना येथे ५० लाखांच्या रस्त्याचे भूमिपूजन

जालना / शेख फारुक

शहराचा विकास करताना पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्व नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि नेत्यांना सोबत घेणे आवश्यक आहे. नगरसेवक कोणत्या पक्षाचा आहे हे न पाहता त्याच्या प्रभागातील नागरिकही आपलेच आहेत या भावनेतून काम केले पाहिजे. नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि शहराचा सर्वांगीण विकास करणे हेच उद्दिष्ट ठेवले तर नगरपालिकेतील संघर्ष संपुष्टात येऊन रखडलेली विकासकामे मार्गी लागतील असा मोलाचा आणि अनुभवी सल्ला माजी नगराध्यक्ष भास्कर‌राव अंबेकर यांनी महापौर वंदनाताई मगरे यांना दिला.शहरातील मोदीखाना परिसरात ५० लाख रुपये खर्चाच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन माजी मंत्री आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात अंबेकर बोलत होते.माजी नगरसेवक विष्णू वाघमारे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी व्यासपीठावर आमदार अर्जुनराव खोतकर,महापौर वंदनाताई मगरे,उपमहापौर राजेश राऊत,शहरप्रमुख विष्णू पाचफुले,विरोधी पक्षनेते कमलेश खरे,माजी शहरप्रमुख बाला परदेशी, नगरसेवक दिनेश भगत,नरेश खुदभैय्ये आदी मान्यवर उपस्थित होते.

विकासकामांचे श्रेय अखेर कारभार करणाऱ्यालाच कार्यक्रमात एका वक्त्याने दहा महिन्यांत पहिल्यांदाच एखाद्या विकासकामाचे भूमिपूजन होत आहे.असा उल्लेख केला. याच मुद्द्याचा धागा पकडत भास्कर‌राव अंबेकर यांनी आपल्या खास मिश्कील आणि अभ्यासपूर्ण शैलीत महापौरांना कारभाराचे महत्त्व पटवून दिले.निधी आमदार अर्जुनराव खोतकर किंवा पक्षातील वरिष्ठ नेते आणतील मात्र त्या निधीतून शहरात विकासकामे होत असताना त्याचे श्रेय महापौर आणि सत्ताधाऱ्यांनाच मिळत असते. त्यामुळे आपकी कृपा से सब काम हो रहा है करते हो बाबा तुम लेकिन मेरा नाम हो रहा है...हे भजन लक्षात ठेवून कारभार करावा असे मिश्कील उदाहरण त्यांनी दिले.घरातील कर्ता पुरुष



दिवसभर कष्ट करून नोकरी अथवा मजुरीतून पैसे कमावतो घरासाठी किराणा आणि राशन आणतो मात्र स्वयंपाक घरातील महिला करते आणि तिच्या हातच्या जेवणाचेच कौतुक होते. त्याचप्रमाणे शहराच्या विकासाचा कारभार करण्याची संधी महापौरांच्या हातात आहे. निधी कोणीही आणला तरी त्याचा योग्य विनियोग करून शहरात दर्जेदार विकासकामे केली तर त्याचे श्रेय निश्चितच महापौरांना मिळणार आहे असे सांगत त्यांनी उपस्थितांना हसवतानाच विचार करायलाही भाग पाडले.

राजकारणापेक्षा विकासाला प्राधान्य द्या मी नगराध्यक्ष असताना आमदार काँग्रेस पक्षाचे होते आणि त्यांच्या पक्षाचे अनेक नगरसेवकही होते.मात्र त्यावेळी कधीही पक्षीय भेदभाव केला नाही. सर्वांना सोबत घेऊन शहरातील विकासकामे करण्यावर भर दिला असा आपल्या कारकिर्दीतील अनुभवही अंबेकर यांनी सांगितला.महापालिकेत आपण वेगवेगळ्या पक्षांचे असलो, तरी वरिष्ठ पातळीवरील सत्तेत आपण एकत्र आहोत ही बाब लक्षात घेऊन शहराच्या हितासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे.राजकीय मतभेद बाजूला ठेवून नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे आणि रखडलेली विकासकामे मार्गी लावावीत असे आवाहन त्यांनी महापौरांसह पालिकेतील सत्ताधाऱ्यांना केले.

भास्कर‌राव अंबेकर यांच्या अनुभवपूर्ण मिश्कील आणि मार्मिक मार्गदर्शनाने कार्यक्रमात हास्याचे फवारे उडाले.मात्र त्यांच्या वक्तव्यातून शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेला समन्वय आणि राजकीय परिपक्वतेचा संदेशही ठळकपणे समोर आला.यावेळी प्रभागातील नागरिक,पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

पेज नंबर २ वर वाचा..

वैचारिक अग्रलेख...

नारपाणी : एक वरदान!

दैनिक

समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकारांचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक – ७७ शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-7th Issue-77 Friday, Dt.27 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

पशुधन उद्योजकता योजना ग्रामीण युवकांना उद्योजक बनवेल – पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे

मुंबई प्रतिनिधी

ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगारापुरते मर्यादित न ठेवता पशुधन क्षेत्रातील उद्योजक बनविण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' आजपासून कार्यान्वित करण्यात आली आहे. ग्रामीण युवकांच्या प्रयत्नांना शासनाच्या आर्थिक मदतीची जोड देऊन पशुधन क्षेत्रातील उद्योजकांची नवी पिढी घडविण्यात येईल. ही योजना ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा बदलणारी ठरेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पशुसंवर्धन विभागाने चांगले काम केल्याबद्दल पशुसंवर्धन विभागाचे अभिनंदन केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसह राज्य शासनाच्या विविध विभागांच्या १७४ सेवा व प्रकल्पांचे लोकार्पण झाले. त्यावेळी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे बोलत होत्या. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, मंत्री ॲड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव तसेच समग्र आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

लाभार्थ्यांना योजनेचा थेट लाभ..

पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, राज्य शासन विविध योजनांचे लाभ थेट लाभ हस्तांतरणाद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचवत आहे. या लाभांसोबतच नागरिकांची कार्यक्षमता, स्वावलंबन आणि स्वतःच्या कर्तृत्वावर प्रगती करण्याची इच्छा कायम राहणे आवश्यक आहे. ग्रामीण युवकांनी रोजगार मागण्याऐवजी स्वयंरोजगार निर्माण करावा आणि उद्योजक म्हणून पुढे यावे, हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. पशुसंवर्धन विभागाने योजनेचे



सादरीकरण केल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी पहिल्याच अर्थसंकल्पात या योजनेसाठी तरतूद केली.

विभागाने महाआयटीच्या सहकार्याने योजनेसाठी आवश्यक ऑनलाइन प्रणाली विकसित करून तिच्या चाचण्या पूर्ण केल्या आहेत. अर्जापासून लाभ वितरणापर्यंतची प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शक राहणार आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावरील प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे योजनेच्या प्रक्रियेला काही काळ स्थगिती देण्यात आली होती. आता योजनेचा प्रारंभ झाला असून प्रत्येक जिल्ह्यासाठी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. ऑनलाइन अर्जांमधून प्राप्त होणाऱ्या प्रतिसादाच्या आधारे पशुधन व्यवसायाचे समूह कोणत्या भागांत उभारता येतील, याचे नियोजन विभाग करणार आहे. हा योजनेच्या पुढील टप्प्याचा भाग असेल, असे मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

या योजनेत ५० टक्के अनुदानाची तरतूद असून महिला तसेच अनुसूचित जाती-जमातीतील लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान मिळेल. दूध, अंडी, कुक्कुटपालन, मांस उत्पादन आणि वराहपालन या क्षेत्रांत पशुधन व्यवसायाचे समूह विकसित करण्यावर विभाग भर देणार आहे. आदिवासी भागांत वराहपालन व्यवसायाला मोठी संधी असून स्थानिक युवकांना त्याद्वारे उद्योजकतेकडे वळवता येईल. पशुधन उत्पादनाच्या विविध क्षेत्रांत महाराष्ट्राला देशात आघाडीचे राज्य बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

लाभार्थ्यांनी स्वतः प्रयत्न करून व्यवसाय उभारावा आणि उत्पन्नाचे शाश्वत साधन निर्माण करावे, अशी या योजनेची रचना आहे. तरुण पिढीला केवळ अनुदान देण्याऐवजी त्यांना स्वतःची उपजीविका उभारण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ग्रामीण युवकांच्या प्रयत्नांना शासनाच्या आर्थिक मदतीची जोड देऊन पशुधन क्षेत्रातील उद्योजकांची नवी पिढी घडविण्यात येईल, असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

अर्जासाठी महाआयडी आवश्यक..

अर्जासाठी फार्मर आयडी अनिवार्य नसून महाआयडी आवश्यक आहे. अर्जदारांची आवश्यक माहिती स्वयंचलितरीत्या प्राप्त करण्याचे नियोजन विभागाने केले आहे. त्यामुळे अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ होऊन योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखता येणार आहे. लोकप्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत प्राप्त सूचनांचा योजनेच्या अंमलबजावणीत विचार करण्यात येत आहे. आकांक्षित तालुक्यांना अधिक प्रोत्साहन द्यावे आणि तेथे निश्चित उद्दिष्टाचे बंधन ठेवू नये, अशी सूचना ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केली.

पोलीस आपल्या बांधावर' उपक्रमातून बीड पोलिसांची ग्रामीण भागात प्रभावी कामगिरी.!

५,०२९ तक्रारी प्राप्त त्यापैकी ४,९४४ ठिकाणी पोलिसाच्या प्रत्यक्ष भेटी, ९४९ वाद सामोपचाराने मिटविले तर ३,२२८ प्रकरणांत प्रतिबंधात्मक कारवाई

' बीड प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतजमिनीचे बांध, जमिनीच्या हद्दी, शेतरस्ते, पाण्याचे स्रोत, विहिरी, पाइपलाइन तसेच इतर शेतीविषयक कारणांवरून निर्माण होणारे वाद वेळीच मिटवून गावागावांत शांतता व सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'पोलीस आपल्या बांधावर' या उपक्रमाला मोठे यश मिळत आहे. बीड पोलीस मार्फत सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून पोलीस दलाने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून त्यांच्या समस्या समजून घेण्यावर आणि वादांचे वेळीच निराकरण करण्यावर विशेष भर दिला आहे.

ग्रामीण भागात शेतीच्या बांधावरून, जमिनीच्या हद्दीवरून, शेतात जाणाऱ्या रस्त्यावरून, पाण्याच्या वापरावरून किंवा इतर किरकोळ कारणांवरून वाद निर्माण होतात. अनेकदा अशा वादांकडे वेळीच लक्ष दिले जात नाही. परिणामी, वर्षानुवर्षे सुरू राहणारे वाद, परस्परांमधील वैमनस्य, भांडणे आणि त्यातून उद्भवणाऱ्या गंभीर स्वरूपाच्या घटना घडण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत केवळ वाद निर्माण झाल्यानंतर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी वादाच्या मूळ कारणापर्यंत पोहोचून त्यावर वेळीच तोडगा काढण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार संबंधित गावात आणि प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन वादाची पार्श्वभूमी समजून घेतात. संबंधित दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतले जाते. आवश्यकतेनुसार गावातील प्रतिष्ठित नागरिक, नातेवाईक आणि ग्रामस्थांच्या सहकायनि संवाद व समन्वय पडवून आणला जातो. सामोपचाराने वाद मिटविण्यासाठी प्रयत्न करण्याबरोचरच आवश्यक त्या कायदेशीर बाबींचे मार्गदर्शनही केले जाते.

दिनांक ११ जून २०२५ ते २१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत या उपक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा घेतला असता, बीड जिल्हा पोलीस दलाने प्रभावी कामगिरी नोंदविली आहे. या कालावधीत शेतजमिनीच्या वादांसंदर्भात एकूण ५,०२९ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ४,९४४ ठिकाणी पोलीस अधिकारी व अंमलदारांनी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व संबंधितांशी संवाद साधला. या प्रयत्नांतून ९४९ प्रकरणांमध्ये दोन्ही पक्षांमध्ये आपापसातील सामोपचार घडवून आणण्यात यश आले. तसेच ३.२२८ प्रकरणांमध्ये वादाची तीव्रता आणि संभाव्य परिणाम लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.या कामगिरीचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले शेतीविषयक आणि कौटुंबिक वाद संवाद व समन्वयाच्या माध्यमातून मिटविण्यासाठी पोलिसांनी घेतलेला पुढाकार होय. काही प्रकरणांमध्ये अनेक वर्षांपासून एकमेकांशी बोलणेही बंद असलेल्या कुटुंबांमध्ये संवादाची प्रक्रिया सुरू झाली. जमिनीच्या हक्कांवरून, शेतीच्या वापरावरून किंवा बांधाच्या कारणावरून निर्माण झालेला तणाव कमी होऊन संबंधितांना दिलासा मिळाला. अशा प्रकारे पोलिसांनी केवळ तक्रारींची नोंद घेण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष पटनास्थळी जाऊन समस्या समजून घेतल्याने वाद निवारणाच्या प्रक्रियेला सकारात्मक दिशा मिळाली आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील क्षुल्लक कारणांवरून होणारे वाद वेळीच लक्षात येऊन त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे शक्य होत आहे. किरकोळ वादांचे रूपांतर मोठ्या भांडणांत, मारहाणीत किंवा गंभीर गुन्ह्यांत होण्यापूर्वीच पोलिसांचा हस्तक्षेप होत असल्याने संभाव्य तणाव कमी करण्यास मदत होत आहे. यामुळे गावातील शांतता, सामाजिक सलोखा आणि परस्परांमधील संबंध टिकवून ठेवण्यास हातभार लागत आहे.

'पोलीस आपल्या बांधावर' हा उपक्रम म्हणजे प्रतिबंधात्मक पोलीसिंगचा प्रभावी नमुना असून, पोलिसांनी नागरिकांच्या दारात आणि शेताच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या समजून घेण्याची कार्यपद्धती या उपक्रमातून विकसित होत आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये पोलिसांविषयी विश्वासाची भावना वाढण्यास, पोलिसांशी थेट संवाद साधण्यास आणि स्थानिक पातळीवरील वादांचे वेळीच निराकरण करण्यास मदत होत आहे.बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व शेतकरी व ग्रामस्थांना आवाहन करण्यात येते की, शेतीच्या बांधावरून, जमिनीच्या हद्दीवरून, शेतरस्त्यावरून, पाण्याच्या वापरावरून किंवा इतर कोणत्याही कारणावरून वाद निर्माण झाल्यास नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये. वाद वाढण्याची वाट न पाहता जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, संवाद, समन्वय आणि कायदेशीर मागनि समस्येचे निराकरण करण्यासाठी 'पोलीस आपल्या बाधावर' या उपक्रमाचा लाभ घ्यावा.

पत्रकारांच्या मागणीला यश – अखेर शेख बिलाल मेंबर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल

बीड (प्रतिनिधी)

शहरातील पत्रकार कासिफ शेख यांना धमकी दिल्यानंतर सर्व पत्रकारांनी या प्रकरणात कारवाईची मागणी केली होती. अखेर पत्रकारांच्या मागणीला यश आले असून शेख बिलाल मेंबर यांच्याविरूध्द पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड येथील नगरसेवक पती शेख बिलाल यांनी पत्रकार कासिफ शेख यांना फोन लावून धमकी दिली होती. विरोधात बातमी का छापली ? असा जाब विचारत जीवे मारण्याची धमकी दिली होती व अर्वाच्च भाषेचा वापर केला होता. सदरील संभाषणाची ऑडिओ क्लीप सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर या धमकीचा सर्व स्तरातून निषेध करण्यात येत होता. या संदर्भात पत्रकारांनी बिलाल मेंबर यांच्याविरूध्द कारवाई करावी अशी मागणी लावून धरली होती. या प्रकरणात पेठ बीड पोलीस ठाण्यात तक्रार देखील देण्यात आली होती. अखेर पत्रकारांच्या मागणीची दखल घेत पेठ बीड पोलीसांनी शेख बिलाल मेंबर यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

त्या वक्तव्याबद्दल माझी जाहीर दिलगिरी – शेख बिलाल मेंबर

शेख काशिफ हे माझे जुने मित्र आहेत, त्यांच्याविषयी मनात काहीच नसुन मी त्यांना हक्काने बोललो, त्यामध्ये अनावधानाने झालेल्या प्रकाराबद्दल मी दोन दिवसांपुर्वी दिलगिरी देखील व्यक्त केलेली आहे. आजवरच्या माझ्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीत पत्रकारांचे मोठे योगदान राहिलेले आहे. मार्गदर्शकांच्या रूपात हे योगदान कायम सोबत राहिलचं. शेख काशिफ यांच्यासह सर्वच पत्रकारांसोबत माझे सलोख्याचे आणि स्नेहाचे नाते आहे. तरी अनवधानाने माझ्या शब्दामुळे भावना दुखावल्या असतील तर मी दिलगीर व्यक्त करतो, असे शेख बिलाल मेंबर यांनी म्हटले आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांना प्राधान्य द्या – पालक सचिव प्रवीण दराडे

अहिल्यानगर (जिमाका)

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर प्रभावीपणे मात करण्यासाठी उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करून पाणीपुरवठ्याचे स्रोत बळकट करावेत. नागरिकांचे टँकरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विहिरींसारख्या स्थानिक जलस्रोतांचे बळकटीकरण करण्याबरोबरच पाणीपुरवठ्याच्या कायमस्वरूपी उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. जिल्ह्यातील प्रगतीपथावरील नळ पाणीपुरवठा योजनांची कामे वेगाने पूर्ण करावीत, तसेच आवश्यकतेनुसार नळ योजनांची विशेष दुरुस्ती करावी, असे निर्देश सहकार विभागाचे प्रधान सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव प्रवीण दराडे यांनी दिले.

पालक सचिव श्री. दराडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न



राहता दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक असल्याचे श्री. दराडे यांनी सांगितले. गावपातळीवरील उपलब्ध जलस्रोतांची क्षमता वाढविणे, विहिरींचे बळकटीकरण करणे आणि पाणीपुरवठा योजनांमधील अडचणी दूर करणे यावर भर द्यावा. पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत कसा जिरवावा यासाठी धुळे जिल्ह्यातील शिरपूर पॅटर्न चा अभ्यास करावा. प्रगतीपथावरील नळ पाणीपुरवठा योजनांची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

चारा उपलब्धतेसाठी नियोजन करण्याचे आवाहन

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी आगामी हंगामाचे नियोजन आतापासूनच करावे. भविष्यात मका आणि रब्बी ज्वारीच्या क्षेत्रात वाढ करण्यासाठी प्रयत्न करावेत. सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या भागांमध्ये चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांना अधिक प्रमाणात चारा बियाणांचे वाटप करावे, अशा सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या.

पारंपरिक चारा उत्पादनासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चारा उपलब्धता वाढविणे आवश्यक आहे. यासाठी हायड्रोपोनिक चारा उत्पादन पद्धतीबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. या पद्धतीची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना दाखवून त्यांना या तंत्रज्ञानाची माहिती द्यावी. तसेच जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या चाऱ्याचे योग्य पद्धतीने सूक्ष्म नियोजन करून पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध राहील, याची दक्षता घ्यावी, असेही श्री. दराडे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विभागांनी समन्वय साधावा

शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांची केवायसी () प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची प्रलंबित केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महसूल विभाग, कृषी विभाग आणि निबंधक कार्यालय यांनी परस्पर समन्वयाने काम करावे. या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून पात्र शेतकऱ्यांची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देशही पालक सचिव श्री. दराडे यांनी दिले.

****जिल्ह्यातील दुष्काळ निवारण उपाययोजनांचे सादरीकरण***

बैठकीच्या प्रारंभी निवासी उप जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीपुरवठ्याचे नियोजन, चारा उपलब्धता तसेच दुष्काळ निवारणासाठी जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी विविध विभागांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज करण्यास ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

लातूर (जिमाका): राज्य शासनाच्या क्रीडा विभागामा फत राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा अत्यंत प्रतिष्ठित समजला जाणारा 'शिवछत्र पती राज्य क्रीडा पुरस्कार' प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यास ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षींकरिता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांसाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, खेळाडूंसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, साहसी उपक्रमांसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, तसेच दिव्यांग खेळाडूंकरिता शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान केले जातात. शासन निर्णय २९ डिसेंबर, २०२३ व २५ जानेवारी, २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारित नियमावली २०२३ मध्ये विहित करण्यात आली आहे. या सुधारित नियमावलीनुसार, सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या दोन वर्षांच्या पुरस्कारांसाठी राज्यातील उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता पुरस्कार विजेते, खेळाडू, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू व व्यक्ती यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते.

इच्छूक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम विजेते आणि दिव्यांग खेळाडूंनी विहित मुदतीत क्रीडा विभागाच्या https://sports. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ३० नोव्हेंबर, २०२६ दरम्यान रात्री ११:५९ वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन स्वरूपातच आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'भारतीय संविधान दिन' उत्साहात साजरा



अहिल्यानगर (जिमाका)

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात 'भारतीय संविधान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.

कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २०२६
Friday, Dt. 27 November 2026
पान -२
PAGE - 2

संपादकीय

विशेष वैचारिक अग्रलेख..

नारपाणी : एक वरदान!

पाण्याच्या प्रत्येक थेंबात दडले आहे जीवनाचे भविष्य!

पाणी म्हणजे जीवन आणि पाणी म्हणजे निसर्गाने मानवाला दिलेली सर्वात मोठी देणगी. पृथ्वीवरील सजीवसृष्टीचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. मात्र बदलते हवामान, अनियमित पाऊस, वाढती लोकसंख्या आणि पाण्याचा अमर्याद वापर यामुळे आज पाण्याचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अशा परिस्थितीत नारपाण्यासारख्या नैसर्गिक जलस्रोतांचे महत्त्व अधोरेखित करणे गरजेचे आहे.

नारपाणी हा केवळ पाण्याचा स्रोत नसून निसर्गाने मानवाला दिलेले एक वरदान आहे. डोंगरदऱ्या, झरे, ओढे आणि नैसर्गिक जलसाठे यांचे संवर्धन झाले, तर पाण्याची उपलब्धता टिकवून ठेवण्यास मोठी मदत होऊ शकते. ग्रामीण भागातील शेती, पशुधन, वन्यजीव आणि मानवी जीवनासाठी अशा जलस्रोतांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशेषतः दुष्काळी भागात पाण्याचा प्रत्येक स्रोत अमूल्य ठरतो.

आज आपण पाण्याची किंमत पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतरच ओळखतो, ही खरी शोकांतिका आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे, जलस्रोतांची स्वच्छता राखणे आणि वृक्षारोपण करणे या उपाययोजना केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे ही काळाची गरज बनली आहे.

नैसर्गिक जलस्रोतांचे अस्तित्व टिकवायचे असेल तर त्यांच्या परिसरातील अतिक्रमणे, प्रदूषण आणि वृक्षतोड रोखली पाहिजे. गावागावांत लोकसहभागातून जलसंवर्धनाची चळवळ उभी राहिली पाहिजे. शाळांमधून विद्यार्थ्यांना जलसाक्षरतेचे धडे दिले पाहिजेत. कारण आजचा जागरूक विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक आहे.

विशेषतः बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्यात पाण्याचे महत्त्व शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. येथे प्रत्येक थेंबासाठी शेतकरी, महिला आणि ग्रामस्थांना संघर्ष करावा लागतो. त्यामुळे उपलब्ध जलस्रोतांचे जतन करणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी सुरक्षित ठेवणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, पाणी निर्माण करता येत नाही; मात्र पाण्याचे संवर्धन नक्कीच करता येते. निसर्गाने दिलेल्या या अमूल्य देणगीचा आदर करूया. पाण्याचा प्रत्येक थेंब जपूया, जलस्रोतांचे रक्षण करूया आणि जलसमृद्ध गावांच्या निर्मितीसाठी पुढाकार घेऊया. कारण पाणी वाचले तर शेती वाचेल, शेती वाचली तर शेतकरी वाचेल आणि शेतकरी वाचला तर समाजाचे भविष्य सुरक्षित राहील.

****पाण्याचे संवर्धन हीच काळाची गरज आणि जलसंपन्न भविष्य हीच आपली खरी समृद्धी!****

मळू आई देवी यात्रा उत्सवात ५ वर्षीय बालपैलवान श्लोक राठोरचे विशेष आकर्षण.!

फुले-पिंपळगाव, माजलगाव येथे भव्य कुस्ती दंगल मैदान स्पर्धेचे आयोजन



बीड प्रतिनिधी

मळू आई देवी यात्रा उत्सव, फुले-पिंपळगाव, माजलगाव यांच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती दंगल मैदान स्पर्धेत राम तालीम, माजलगाव येथील अवघ्या ५ वर्षांचा बालपैलवान श्लोक दुर्गेश राठोर याने आपल्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्याने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

इतक्या कमी वयात श्लोकने मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने कुस्ती खेळत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यात्रेतील कुस्ती मैदानाचे तो विशेष आकर्षण ठरला. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला रोख रक्कम बक्षीस स्वरूपात देऊन गौरविण्यात आले.

आजच्या धावपळीच्या आणि मोबाईलच्या युगात लहान मुले मोबाईलच्या आहारी जात असताना, मोबाईलपासून दूर राहून कुस्तीचे प्रशिक्षण घेणाऱ्या या चिमुकल्या पैलवानाने क्रीडा क्षेत्रात कौतुकास्पद कामगिरी केली आहे. श्लोकच्या या यशामागे त्याच्या आई-वडिलांचे प्रोत्साहन आणि मेहनत मोलाची आहे. तसेच त्याला कुस्तीचे प्रशिक्षण देणारे राम तालीम, माजलगावचे बंडू मेंडके सर आणि राहुल मेंडके सर (वस्ताद) यांचेही विशेष कौतुक होत आहे.

या छोट्या पैलवानाचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून भविष्यात कुस्ती क्षेत्रात मोठे यश संपादन करण्यासाठी त्याला अनेकांनी शुभेच्छा व प्रोत्साहन दिले आहे.

समाजासाठी एक प्रेरणादायी संदेश.!

आजच्या पालकांनी आपल्या मुलांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवून कुस्ती, कबड्डी, खो-खो यांसारख्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण द्यावे. मुलांना खेळाच्या माध्यमातून शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनवावे आणि क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

बीडमधील अभियंत्यांना पुण्यात नोकरीची संधी

बीड प्रतिनिधी

अभियांत्रिकी (बी.टेक.) आणि पॉलिटेक्निक पदविका पूर्ण केलेल्या आणि शिक्षण सुरू असलेल्या बीड जिल्ह्यातील तरुणांसाठी पुण्याच्या नामांकित 'सिग्मा इलेक्ट्रिकल ग्रुप'मध्ये नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. शहरातील आदित्य इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये शनिवारी (दि. २८ नोव्हेंबर) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत या विशेष रोजगार मेळाव्याचे (कॅम्पस इंटरव्ह्यू) आयोजन करण्यात आले आहे.

मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स शाखेतून उत्तीर्ण झालेले फ्रेशर्स तसेच २०२७ मध्ये अंतिम वर्षाची परीक्षा देणारे विद्यार्थी या भरती प्रक्रियेसाठी पात्र असतील. इच्छुक उमेदवारांनी सोबत अद्ययावत बायोडाटा, सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती आणि पासपोर्ट आकाराचे फोटो घेऊन सकाळी १० वाजता कॉलेजमध्ये उपस्थित राहावे. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम होत आहे. अधिक माहितीसाठी कॉलेजच्या प्लेसमेंट सेलचे सचिन कुलकर्णी (९२२५२६७२५२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन कॉलेज प्रशासनाने केले आहे.

शिक्षणासोबतच करिअरचीही भक्कम साथ : केवळ पदवी देऊन न थांबता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नोकरीची संधी मिळावी, यासाठी आदित्य इंजिनीअरिंग कॉलेज सातत्याने प्रयत्नशील असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांतील नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळावी, या उद्देशाने या कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे पुण्यासारख्या औद्योगिक शहरात करिअर घडवण्याचे स्वप्न साकार होणार आहे - डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था बीड

हजारो विद्यार्थ्यांच्या करिअरला मिळाली दिशा..

आदित्य शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केवळ दर्जेदार शिक्षणच दिले जात नाही, तर विद्यार्थ्यांच्या रोजगाराचीही तितकीच काळजी घेतली जाते. संस्थेत सातत्याने आयोजित केल्या जाणाऱ्या कॅम्पस मुलाखतींमधून आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांची देश-विदेशातील नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी आज मोठ्या पदांवर कार्यरत असून, हीच परंपरा पुढे नेत 'सिग्मा इलेक्ट्रिकल'ची भरती प्रक्रिया राबवली जात आहे.

सेवानिवृत्त सिनियर जेलर राष्ट्रपती पदकाचे मानकरी श्री.अरविंद नागप्या हिरेमठ यांचा एक समृद्ध जीवनप्रवास...



१. जीवनप्रवासाची मंगल सुरुवात-

माझ्या आयुष्याकडे आज वळून पाहताना अनेक आठवणी मनाच्या पटलावर तरळू लागतात. आयुष्य म्हणजे केवळ जन्मापासून मृत्यूपर्यंतचा काळ नव्हे, तर अनुभवांच्या मुशीत घडत जाणारे व्यक्तिमत्त्व, मूल्यांच्या पायावर उभे राहिलेले चारित्र्य आणि कर्तव्याच्या वाटेवर न डगमगता केलेली वाटचाल होय. माझ्या जीवनप्रवासात अनेक चढ-उतार आले, अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले; परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा यांच्याशी मी कधीही तडजोड केली नाही. माझा जन्म महाराष्ट्रातील प्रसिद्ध धार्मिक आणि आध्यात्मिक नगरी असलेल्या श्री स्वामी समर्थांच्या पावन दोडड्याळ ता.अक्कलकोट येथे २८ नोव्हेंबर १९४४ रोजी झाला. अक्कलकोटच्या पवित्र भूमीत बालपण व्यतीत करताना माझ्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. संस्कार, शिस्त, शिक्षण आणि जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी यांची बीजे याच काळात माझ्या मनात रुजली.

२. शिक्षणातून व्यक्तिमत्त्वाची जडणघडण-

माझे प्राथमिक शिक्षण अक्कलकोट येथील सेंट्रल स्कूलमध्ये झाले. त्यानंतर मंगरूळे हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी संगमेश्वर महाविद्यालय आणि दयानंद महाविद्यालय, सोलापूर येथे शिक्षण घेतले. विज्ञान शाखेतून बी.एस्सी. (ऑनर्स) ही पदवी प्राप्त केली. शिक्षणाने मला केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर विचारांची शिस्त, निरीक्षणाची क्षमता, तर्कशुद्ध निर्णय घेण्याची वृत्ती आणि जीवनातील समस्यांकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याची दृष्टी दिली. याच बौद्धिक पायावर माझ्या भावी प्रशासकीय सेवाभावी जीवनाची इमारत उभी राहिली.

३. शासकीय सेवेत प्रवेश आणि कारागृह प्रशासनातील ३३ वर्षांचा प्रवास-

सन १९७० मध्ये माझ्या शासकीय सेवेला प्रारंभ झाला. नाशिक रोड कारागृह येथे रासायनिक पर्यवेक्षक ( ) म्हणून मी काम पाहिले. पुढे सन १९७६ मध्ये, आणीबाणीच्या कालखंडात, कारागृह अधिकारी ( ) म्हणून माझ्यावर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

नाशिक रोड, ठाणे, मुंबई मध्यवर्ती कारागृह (अर्थर रोड), भायखळा, नागपूर, सोलापूर आणि पुणे येथील येरवडा कारागृह अशा विविध ठिकाणी माझ्या बदल्या झाल्या. प्रत्येक ठिकाणचे वातावरण वेगळे, समस्या वेगळ्या, आव्हाने वेगळी आणि जबाबदाऱ्यांचे स्वरूपही वेगळे होते.

कारागृह प्रशासनातील माझी तब्बल ३३ वर्षांची सेवा म्हणजे अनुभवांची एक प्रदीर्घ शृंखला होती. अनेकदा चोवीस तास कामाच्या तयारीत राहावे लागे. अधिकारी म्हणून केवळ कार्यालयीन कामकाज करणे एवढीच माझी भूमिका नव्हती, तर कारागृहातील शिस्त, सुरक्षितता, कायद्याची अंमलबजावणी आणि कैद्यांच्या मानवी हक्कांची जपणूक या सर्व बाबींचा समतोल राखणे ही माझी जबाबदारी होती. या सेवेमुळे मला समाजातील विविध स्तर, मानवी स्वभावाचे अनेक पैलू, राजकारणातील गुंतागुंत आणि कायद्याच्या व्यवस्थेचे वास्तव जवळून अनुभवता आले. या अनुभवांनी मला तावून-सुलाखून काढले; परंतु माझ्या तत्त्वनिष्ठेचा पाया कधीही ढळू दिला नाही.

४. मुंबई मध्यवर्ती कारागृह(अर्थर रोड कारागृह) : आव्हानांच्या केंद्रस्थानी कर्तव्यनिष्ठा-

मुंबईतील मुंबई मध्यवर्ती कारागृहातील माझी नियुक्ती हा माझ्या सेवा-प्रवासातील अत्यंत आव्हानात्मक काळ होता. नुकतेच माझा सिनिअर जेलर म्हणून बढती झाली होती. मुंबईत बॉम्बस्फोटांची मालिका घडली होती. त्यानंतर गुन्हेगारी जगताशी संबंधित अनेक बॉम्ब ब्लास्ट व्यक्तींच्या अटकसत्राला सुरुवात झाली. गुन्हेगारी जगतातील प्रभावशाली व्यक्ती, तसेच काही सीमा शुल्क आणि पोलीस अधिकारी, प्रसिद्ध सिने कलाकार संजय दत्त यांनाही अटक झाली होती.

अशा संवेदनशील परिस्थितीत कारागृह प्रशासनाची जबाबदारी सांभाळणे हे अत्यंत जिकिरीचे काम होते. राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय दबावाचे वातावरण होते. अनेकदा मनावर प्रचंड ताण येत असे. वेगवेगळ्या स्वरूपाचे कायदे, गुन्ह्यांचे गांभीर्य आणि कैद्यांचे विविध स्वभाव यांचा विचार करून निर्णय घ्यावे लागत. मात्र माझ्यासाठी एक गोष्ट नेहमीच स्पष्ट होतीकायद्यापुढे सर्व समान आहेत. नियम सर्वांसाठी सारखेच असतात. कोणत्याही व्यक्तीचा दबाव, प्रतिष्ठा किंवा सामाजिक स्थान यामुळे कायद्याच्या चौकटीत बदल होता कामा नये. त्याचवेळी कैद्यांशी माणुसकीने वागणे, त्यांच्या मूलभूत गरजांची काळजी घेणे आणि त्यांना सुधारण्याची संधी उपलब्ध करून देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे, याची मला जाणीव होती.

५. कारागृह म्हणजे केवळ शिक्षेचे ठिकाण नव्हे, तर परिवर्तनाची कार्यशाळा!

माझ्या दृष्टीने कारागृह प्रशासनाचे कार्य केवळ कैद्यांना बंदिस्त ठेवणे किंवा शिक्षा भोगण्यापुरते मर्यादित नव्हते. कारागृह ही व्यक्तीच्या आत्मपरीक्षणाची, आत्मपरिवर्तनाची आणि नव्याने जीवन उभारण्याची संधी देणारी व्यवस्था असली पाहिजे, असे मला नेहमी वाटत आले. एखाद्या व्यक्तीकडून गुन्हा घडला म्हणजे त्याचे संपूर्ण आयुष्य संपले, असे मानणे योग्य नाही. प्रत्येक माणसामध्ये सुधारण्याची क्षमता असते. त्याला योग्य मार्गदर्शन, शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि कौशल्यविकासाची संधी दिली, तर तो पुन्हा सन्मानाने समाजात जगू शकतो.

म्हणूनच कैद्यांचे पुनर्वसन, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे आणि कारागृहातून बाहेर पडल्यानंतर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सक्षम करणे, या बाबींना मी विशेष महत्त्व दिले.

माझ्या मनात नेहमी एक विचार असायचाशिक्षा ही केवळ गुन्ह्याचे उत्तर नसून, माणसाला योग्य मार्गावर आणण्याची एक संधीदेखील असली पाहिजे.

६. आणीबाणीचा काळ आणि राजकीय कैद्यांची जबाबदारी -

माझ्या सेवाकाळातील आणखी एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक अनुभव म्हणजे सन १९७५-७७ मधील आणीबाणीचा कालखंड. नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात कार्यरत असताना या काळातील प्रशासकीय जबाबदाऱ्या माझ्यावर होत्या. त्या वेळी स्व. प्रमोद महाजन, ज्येष्ठ राजकारणी स्व.मोहन धारिया,स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्यासह सुमारे १८०० राजकीय कैदी कारागृहात होते.

या सर्व कैद्यांच्या भेटीगाठी आणि मुलाखतींच्या व्यवस्थापनाशी संबंधित जबाबदारी अत्यंत संवेदनशील होती. राजकीय विचारधारा, व्यक्तींचे स्थान आणि त्या वेळची परिस्थिती यांचा विचार करता प्रशासनाला अत्यंत दक्षतेने काम करावे लागत असे.

माझ्यासाठी मात्र प्रत्येक व्यक्ती ही सर्वप्रथम कायद्याच्या चौकटीतील एक व्यक्ती होती. कोणत्याही राजकीय विचारसरणीचा प्रभाव न पडू देता, नियमांचे पालन करून जबाबदारी पार पाडणे हेच माझे कर्तव्य होते.

७. भायखळा कारागृहातील अनुभव आणि निर्भीड कार्यशैली-

भायखळा कारागृहातील नियुक्तीच्या काळात अनेक महत्त्वाच्या आणि संवेद-नशील जबाबदाऱ्या माझ्याकडे होत्या. हर्षद मेहता यांच्या कोठडीची अचानक तपासणी करण्यासारख्या घटनाही माझ्या सेवाप्रवासात घडल्या.

अशा प्रत्येक प्रसंगी माझ्या मनात एकच विचार असायचाअधिकाऱ्याचे खरे सामर्थ्य त्याच्या पदात नसते, तर त्याच्या निर्णयक्षमतेत, निर्भीडपणात आणि प्रामाणिकपणात असते. कारागृहातील जबाबदारी पार पाडताना अनेकदा कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. गुन्हेगारी जगताशी संबंधित व्यक्तींकडून धमकीचे फोन येत असत. मात्र अशा धमक्यांमुळे मी कधीही माझ्या कर्तव्यापासून मागे हटलो नाही. कालांतराने या परिस्थितीचा सामना करण्याची मानसिक ताकद निर्माण झाली.

८. जीवावर बेतलेले प्रसंग; पण कर्तव्यापासून माघार नाही!

माझ्या जीवनप्रवासात दोन वेळा माझ्यावर हल्ला करण्याचे प्रयत्न झाले. त्यापैकी एक प्रसंग ठाणे वसाहतीमध्ये पोलीस आयुक्त कार्यालयासमोर घडला, तर दुसरा प्रसंग आर्म गार्डच्या सेंट्री पोस्टजवळ घडला.

हे प्रसंग अत्यंत गंभीर आणि मनाला हादरवून टाकणारे होते. मात्र परमेश्वराची कृपा आणि सर्वशक्तिमान ईश्वराच्या आशीर्वादामुळे दोन्ही वेळा मी सुरक्षित राहिलो.

या घटनांनी जीवनाचे अनिश्चित स्वरूप प्रकर्षाने जाणवून दिले. परंतु त्याचवेळी माझ्या मनातील कर्तव्यनिष्ठेची ज्योत अधिक प्रखर झाली. संकट कितीही मोठे असले, तरी तत्त्वांशी तडजोड करायची नाही, हा माझा निर्धार अधिक दृढ झाला.

९. कुटुंब : माझ्या शक्तीचा आधारस्तंभ

शासकीय सेवेत असताना माझे संपूर्ण आयुष्य कामाच्या व्यापात आणि जबाबदाऱ्यांच्या भोवऱ्यात फिरत होते. मात्र या धावपळीच्या प्रवासात माझ्या कुटुंबाचे योगदान अनमोल आहे.

माझी पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असे माझे छोटेसे कुटुंब हेच माझ्या आयुष्यातील खरे सामर्थ्य होते. माझ्या कामाचे स्वरूप असे होते की अनेकदा घरापासून दूर राहावे लागे. सततच्या बदल्या, अनिश्चित कामाच्या वेळा, तणावपूर्ण वातावरण आणि सुरक्षिततेविषयीची चिंता यांचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होत असे.

धमक्यांचे फोन, जीवाला असलेला धोका आणि कामाचा ताण या सर्व गोष्टी कुटुंबालाही सहन कराव्या लागत होत्या. तरीही माझ्या पत्नीने कधीही तक्रारीचा सूर लावला नाही. तिने अत्यंत समंजसपणे संसाराची धुरा सांभाळली आणि मला माझ्या कर्तव्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी भक्कम आधार दिला. माझ्या यशामागे माझ्या पत्नीचा मोठा वाटा आहे. तिच्या त्यागाशिवाय आणि सहकार्याशिवाय हा प्रवास इतक्या समर्थपणे पूर्ण करणे शक्य झाले नसते.

माझ्या कुटुंबाला माझ्या प्रामाणिक कार्याचा अभिमान वाटतो, ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. माझ्या कुटुंबाने माझ्या तत्त्वनिष्ठेचा नेहमीच आदर केला. त्यांच्या या विश्वासाने मला प्रत्येक संकटात नवी ऊर्जा दिली.

१०. कार्याची दखल आणि राष्ट्रपती पदकाचा बहुमान...

दीर्घकाळ केलेल्या प्रामाणिक आणि समर्पित सेवेची दखल घेतली जाणे ही प्रत्येक कर्मयोग्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब असते.

कारागृह प्रशासनातील सुधारणा, कैद्यांचे पुनर्वसन आणि शिस्तबद्ध कार्यपद्धती यांसाठी आम्ही केलेल्या प्रयत्नांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेतली. तत्कालीन कारागृह महासंचालक श्री. सिंगरवेल यांनी आमच्या विभागाच्या कार्याचे कौतुक करून आमच्या योगदानाची प्रशंसा केली.

माझ्या सेवाप्रवासातील एक अविस्मरणीय गौरवक्षण म्हणजे २६ जानेवारी २००१ रोजी राज्यपालांच्या हस्ते प्राप्त झालेला राष्ट्रपती पदकाचा सन्मान. कारागृह सुधारणा सेवेसाठी मिळालेला हा प्रतिष्ठित बहुमान माझ्यासाठी केवळ वैयक्तिक पुरस्कार नव्हता, तर अनेक वर्षांच्या निष्ठावान सेवेला मिळालेली राष्ट्रीय स्तरावरील मान्यता होती. १३ मार्च २००२ रोजी इंडियन एक्सप्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तांतात कारागृह सुधारणा सेवेसाठी मला प्रतिष्ठित राष्ट्रपती पदक मिळाल्याचा उल्लेख करण्यात आला होता. त्या क्षणी माझ्या मनात एकच भावना होत-ीप्रामाणिकपणे केलेल्या कार्याची कधीतरी योग्य दखल घेतली जातेच. पदक हे धातूचे असले, तरी त्यामागे असंख्य दिवसांचा संघर्ष, त्याग, जबाबदारी आणि निष्ठेचा इतिहास दडलेला असतो.

११. अनुभवांची शिदोरी : जीवन म्हणजे एक आव्हानात्मक प्रवास

माझा जीवनप्रवास आठवताना तो एखाद्या रोलर कोस्टर राईडसारखा वाटतो. कधी आनंदाचे क्षण, कधी संघर्षाचे वळण, कधी संकटांचे ढग, तर कधी यशाचे सोनेरी किरण!

या प्रवासात समाजाचे अनेकविध चेहरे पाहिले. माणसातील चांगुलपणा अनुभवला, तर स्वार्थ, सत्तेचा दुरुपयोग आणि गुन्हेगारीचे वास्तवही जवळून पाहिले.

कधी माध्यमांमध्ये वस्तुस्थितीचा विपर्यास झाल्याचेही अनुभवले. मात्र अशा घटनांमुळे माझ्या मनातील सत्यनिष्ठा कधीही कमी झाली नाही.

शासकीय सेवेत असताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवलीदबाव आणि आव्हाने ही प्रत्येक क्षेत्रात असतात. परंतु ज्याने आपल्या अंतःकरणाशी प्रामाणिक राहण्याचा निर्णय घेतला आहे, त्याला बाह्य दबाव फार काळ विचलित करू शकत नाही.

माझ्या मते, अधिकाऱ्याच्या कार्याचे खरे मूल्यमापन त्याने किती वर्षे सेवा केली यावर होत नाही, तर त्या सेवेतून समाजासाठी किती सकारात्मक परिवर्तन घडवून आणले यावर होते.

१२. सेवानिवृत्तीनंतरचे समाधानमय जीवन

३३ वर्षांच्या प्रदीर्घ कारागृह सेवेतील अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर मी शासकीय सेवेतून निवृत्त झालो. आज मागे वळून पाहताना मनात कोणतीही खंत नाही. उलट, माझ्या आयुष्यातील प्रत्येक अनुभवाने मला काहीतरी शिकवले, समृद्ध केले आणि अधिक सक्षम बनवले, याचे समाधान आहे. आज प्रकृती उत्तम असून पत्नी, मुले, नातवंडे आणि कुटुंबीयांसोबत आनंदाने जीवन व्यतीत करत आहे. आयुष्याच्या या उत्तरार्धात कुटुंबाचा सहवास, आप्तस्वकीयांचे प्रेम आणि जुन्या आठवणींची शिदोरी हेच माझ्या आनंदाचे खरे धन आहे.

माझ्या जीवनाकडे पाहताना मला जाणवते की माणसाने आयुष्यात किती संपत्ती मिळवली, किती पदे भूषविली किंवा किती अधिकार उपभोगले यापेक्षा त्याने आपल्या कर्तव्याशी किती निष्ठा राखली, हे अधिक महत्त्वाचे आहे.

माझ्या संपूर्ण सेवाप्रवासात मी एकच गोष्ट जपलीप्रामाणिकपणा हा माझा स्वभाव, कर्तव्यनिष्ठा हा माझा धर्म आणि माणुसकी ही माझी जीवनदृष्टी.!

१३. ८२ वर्षांच्या जीवनप्रवासाचा गौरव : एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

आज माझ्या आयुष्याची ८२शी वर्षे पूर्ण होत असताना मागील आठ दशकांहून अधिक काळाचा जीवनपट डोळ्यांसमोर उभा राहतो. बालपणापासून शिक्षणापर्यंत, शासकीय सेवेत प्रवेशापासून आव्हानात्मक कारागृह प्रशासनापर्यंत आणि संघर्षापासून सन्मानापर्यंतचा हा प्रवास अनेक अनुभवांनी समृद्ध झाला आहे.

मला मिळालेला राष्ट्रपती पदकाचा बहुमान हा माझ्या कार्याचा गौरव आहेच; परंतु माझ्या कुटुंबाने माझ्यावर ठेवलेला विश्वास, सहकाऱ्यांनी दिलेला सन्मान आणि समाजात निर्माण झालेली प्रामाणिक अधिकाऱ्याची ओळख ही माझ्या जीवनातील सर्वांत मोठी कमाई आहे.

माझ्या मते, आयुष्याचे खरे यश पद, पैसा किंवा प्रसिद्धी यात नसते. तर आपण आपल्या तत्त्वांशी किती प्रामाणिक राहिलो, संकटांमध्ये किती खंबीर उभे राहिलो आणि आपल्या कार्यातून किती जणांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकलो, यात असते. कारण पदे येतात आणि जातात, अधिकार संपतात; परंतु प्रामाणिकपणे केलेल्या कार्याचा सुगंध काळाच्या पलीकडेही दरवळत राहतो.

समारोप : सचोटीच्या वाटेवर चालणाऱ्या कर्मयोग्यास मानाचा मुजरा.

हा माझा जीवनप्रवास म्हणजे केवळ एका शासकीय अधिकाऱ्याची कारकीर्द नाही, तर कर्तव्यनिष्ठेच्या धगधगत्या यज्ञात स्वतःला समर्पित करणाऱ्या एका कर्मयोग्याची प्रेरणादायी गाथा आहे.

सत्तेचे आकर्षण नाही, पदाचा गर्व नाही, संकटांची भीती नाही आणि प्रलोभनांपुढे झुकण्याची वृत्ती नाहीअशी तत्त्वनिष्ठ जीवनशैली मी जपली. कारागृहाच्या कठोर वातावरणात कार्य करतानाही माणुसकीचा ओलावा कायम ठेवला. कायद्याचा सन्मान राखताना मानवी मूल्यांची ज्योत विझू दिली नाही.

त्यांच्या जीवनाकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, खरा अधिकारी तोच असतो जो अधिकाराचा उपयोग स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी नव्हे, तर समाजाच्या हितासाठी करतो.

८२ वर्षांचा हा जीवनप्रवास म्हणजे अनुभवांचे विद्यापीठ, सचोटीचा आदर्श, धैर्याचा दीपस्तंभ आणि कर्तव्यनिष्ठेचा जिवंत दस्तऐवज आहे.

प्रसिद्ध कवी ग.दि. माडगूळकर यांच्या कवितेने माझ्या लेखाचे समारोप करत आहे.

धन्यवाद.

जग हे बंदिशाला
कुणी न येथे भला चांगला जो तो पथ चुकलेला
ज्याची त्याला प्यार कोठडी कोठडीतले सखे सोंगडी
हातकडी की अवजड बेडी प्रिय हो ज्याची त्याला
जो तो आपल्या जागी जखडे
नजर न धावे तटापलीकडे
कुणाला माहित सजा किती ते
कोठून आलो ते नच स्मरते
सुटके लागी मन घाबरते जो आला तो रमला.

शब्दांकन.....
अरविंद हिरेमठ
सेवानिवृत्त वरिष्ठ तुरुंगाधिकारी,
महाराष्ट्र सरकार.

सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याची थोडक्यात माहीती

महात्मा ज्योतिराव फुले यांचे वंशज गोऱ्हे, मूळचे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कटगुण या गावाचे. महात्मा फुले यांचे पणजोबा यांचे कटगुणांच्या कुलकर्णी बरोबर भांडण होऊन विकोपाला गेले म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पंजोबांनी कुटुंबासहित कटगुण गाव सोडण्याचा निर्णय घेतला व ते सर्व कुटुंबासहित पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील सासवड जवळ खानवडी या गावी आले. तेथं त्यांनी शेत जमीन घेऊन घर बांधले. ग्राम पंचायत मालमत्ता नोंदवही मध्ये आजही जमीन व घराची नोंद आहे. (पुरंदर तालुक्यात स्मारक समितीच्या वतीने १९९५ मध्ये स्मारक बांधून उद्घाटन केले) ज्योतिरावांचे आजोबा शेटीबा गोऱ्हे खानवडी येथून पुण्याला आले. पुण्यात घर बांधले. शेटीबाना राणोजी, कृष्णा व गोविंद ही तीन मुले होती ते तिन्ही मुले पुण्याच्या पेशव्यांना फुले पूरवण्याचा व्यवसाय करत असत. त्यांच्या कामावर खुश होऊन पेशव्यांनी त्यांना ३५ एकर जमीन इनाम दिली. गोऱ्हे कुटूंबाच्या फुलांच्या व्यवसायावरून लोक त्यांना फुले म्हणू लागले. म्हणून त्यांनी गोऱ्हे आडनाव बदलून फुले आडनाव लावले. तेव्हा पासून फुले आडनाव प्रचलित झाले.सन १८१८ सली पेशवाईचा अस्त झाला व पुण्यावर इंग्रज राजवट अंमलात आली. पेशवे कालीन समाज व्यवस्थेमध्ये जातिभेद व वर्णभेद रूढ होते. सामाजिक विषमता, अज्ञान चालीरीती, अंधश्रद्धा , सामाजिक गुलामगिरी, विधवा विवाह, बालविवाह बालहत्या, विधवांचे केश कापणे, स्पृश्य- अस्पृश्य - शूद्र, अती शूद्र इत्यादी सामाजिक प्रथा रूढ होत्या. समाजात उच्चवर्गायाचे वर्चस्व होते. व त्यांचे सामाजिक गुलामगिरीत पिचलेल्या शूद्र-अतिशूद्रावर अत्याचार होत होते. अशा या कठीण काळात महात्मा फुले यांचे वडील गोविंदराव फुले आपल्या दुकानात भाजी व फुले विक्रीचा व्यवसाय करीत होते. याच सुमारास गोविंदराव फुले यांचा विवाह झगडे पाटलांच्या मुलीसोबत झाला मुलीचे नाव चिमणाबाई होते. त्यांना दोन मुले झाली पहिला राजाराम व दुसरा क्रांतीसुर्य ज्योतिराव. ज्योतिरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी गंज पेठ पुणे येथे झाला. हाच वाडा फुले यांच्या क्रांतीकार्याचा साक्षीदार आहे.ज्योतिरावांचे प्राथमिक शिक्षण पंतोजीच्या शाळेत १८३४ मध्ये सुरू झाले परंतु ज्योतिरावांच्या चाणाक्ष बुद्धिमत्तेमुळे त्यांच्या वडिलांना काही दृष्ट लोकांनी सांगून त्यांचे शिक्षण बंद केले. गोविंदरावांनी मग त्यांना घराच्या कामाला जुंपले पण हुशार व कुशाग्र बुद्धीच्या ज्योतिरावने वाचन आणि लेखन चालूच ठेवले. त्यांच्या घराशेजारी मुन्शी बेग व लिजीट इंग्रज साहेब राहत होते. त्यांना ज्योतिरावंच असामान्य बुद्धिमत्तेची जाणीव झाली व त्यांनी दोघांनी गोविंदरावांना सांगून तब्बल तीन वर्षांनी म्हणजे १८४१ साली इंग्रजी मिशनच्या शाळेत ज्योतिरावांना पाठविण्यास गोविंदरावांना भाग पाडले. पददलित समाजावर होणारे अन्याय व अत्याचार पाहून ज्योतिरावांचे मन अतिशय दुःखी होते असे या

दैनिक समर्थ राजयोग
राजधानी-राजधानी
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
वेचक वृत्त
शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २०२६
Friday, Dt. 27 November 2026
पान –३
PAGE - 3

बीडमध्ये आम आदमी पार्टीचा वर्धापन दिन व संविधानदिन उत्साहात साजरा.!

संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन लोकशाही, समता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे जतन करण्याचा निर्धार

बीड / प्रतिनिधी

आम आदमी पार्टीच्या वर्धापन दिनानिमित्त आणि भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून गुरुवार,दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी बीड येथे आम आदमी पार्टीच्या वतीने संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विविध सामाजिक,शैक्षणिक, राजकीय आणि शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षक संघाचे सचिव राजकुमार कदम सर होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डी.जे. तांदळे उपस्थित होते.

यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला दिलेला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचे महत्त्व विशद करण्यात आले. संविधानिक अधिकारांचे संरक्षण आणि लोकशाही व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले. मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवरांनी संविधानाचे महत्त्व, शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक समता, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सामान्य नागरिकांच्या हक्कांविषयी आपले विचार मांडले. आम आदमी पार्टीच्या वर्धापन दिनानिमित्त पक्षाच्या स्थापनेपासून सामान्य नागरिकांचे प्रश्न, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि पारदर्शक कारभारा साठी सुरू असलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला. जनतेच्या



प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे यांनी संविधान दिनाचे महत्त्व सांगताना संविधान हा देशातील लोकशाहीचा आणि प्रत्येक नागरिकाच्या अधिकारांचा आधार स्तंभ असल्याचे नमूद केले. संविधानातील मूल्यांची जपणूक करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरामध्ये मराठवाडा शिक्षक संघाचे सचिव राजकुमार कदम सर, प्राचार्य डी.जे.तांदळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विभागीय अध्यक्ष रवींद्र भीमाशंकर इंगळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजूजी गायके,बीड जिल्हा भ्रष्टाचार समितीचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, सुतार समाजाच्या जिल्हाध्यक्ष किस्किंदाताई पांचाळ, ह.भ.प.डाके अण्णा, बाजार समिती बीडचे संचालक हळे अण्णा, माजी सैनिक प्रकाश वाघमारे, पत्रकार दत्तात्रय सौंदरमल, सामाजिक कार्यकर्ते अरुणजी खेमाडे, रफिक पठाण जिल्हा उपाध्यक्ष, माऊली शिंदे, कैलासचंद पालीवाल, सय्यद सादेक शहराध्यक्ष, कृष्णाजी जगताप बीड तालुकाध्यक्ष, आजम खान तालुकाउपाध्यक्ष, ॲड.डी.बी. बिक्कड केज तालुकाध्यक्ष, नाना साबळे, आबा हळे केज तालुका उपाध्यक्ष, सुरेखाताई जाधव, बाजीराव ढाकणे साहेब,दहे ताई यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि आम आदमी पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधानाचा सन्मान, लोकशाही मूल्यांचे संवर्धन आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

स्वारातीम विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा

संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन; संविधानिक मूल्ये जपण्याचा संकल्प

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :-



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

यानंतर कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या उपस्थितीत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधानातील मूलभूत मूल्ये, लोकशाही, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या तत्त्वांप्रती बांधिलकी व्यक्त करण्यासाठी विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रासह विविध संकुलांमध्येही संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, आयक्यूएसी सेलचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनिता पाटील, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, रामदास पेद्देवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, विधी अधिकारी विनायक भोसले, सहायक कुलसचिव अनुरुद्ध राहेगावकर, उपअभियंता अरुण धाकडे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान दिनाच्या निमित्ताने उपस्थितांनी भारतीय संविधानाने अधिष्ठित केलेली मूल्ये जपण्याचा, त्यांचा दैनंदिन जीवनात अंगीकार करण्याचा तसेच लोकशाही व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आपापल्या स्तरावर योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला.

जिल्हा परिषद हायस्कूल आष्टूर येथे संविधान गौरव दिन उत्साहात साजरा

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :-

लोहा तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल, आष्टूर येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी टोम्पे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेभाऊ बाबर, उपाध्यक्ष गोविंद ससाने, सदस्य विके ससाने, उपसरपंच बाबासाहेब बाबर, सूरज वैद्य व डॉ. वसंत लुंगारे यांची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांनी संविधान विषयावर मनोगते व्यक्त केली. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संविधानविषयक विविध उपक्रमही राबविण्यात आले. याप्रसंगी बाबासाहेब बाबर यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत मूल्ये आणि नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक शिवाजी टोम्पे म्हणाले की, संविधान ही देशाची मूलभूत चौकट असून, विविध राज्ये, जाती, धर्म आणि पंथांचे लोक एकत्र नांदतात. देशात एकात्मता व एकवाक्यता टिकून राहण्यामागे संविधानाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास करून त्यातील महत्त्वपूर्ण बाबींचा भारतीय संविधानात समावेश केला. संविधानाने माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आणि समानतेचा संदेश दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास एम. के. मुल्ला, एन. एम. कावळे, एन. जी. स्वामी, जी. एस. शिंदे, बी. एस. घोरपडे, टी. आर. लऊबंदे, एन. एन. बोराडे, एस. व्ही. काढवदे, बळीराम मोरे, गोविंद मोरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

संविधान गौरव ग्रंथ दिंडीतून मारतळ्यात मूल्यांचा जाग

मारतळा शाळेचा अभिनव उपक्रम; २६/११ च्या वीरांना आदरांजली

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- भारतीय संविधान दिनानिमित्त लोहा तालुक्यातील मारतळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आज संविधान गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संविधान गौरव ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून गावात संविधान मूल्यांचा जागर करण्यात आला. या उपक्रमाचे नियोजन शाळेच्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम स्काऊट पथकाने केले होते.

विद्यार्थ्यांनी वारकरी, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत गावातून भव्य दिंडी काढली. संविधान गौरव ग्रंथाचे दर्शन घडवत विद्यार्थ्यांनी संविधान दिनाचा विजय असो, संविधान गौरव दिन चिरायू होवो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. ग्रामस्थांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले.

यावेळी २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात नागरिकांचे संरक्षण करताना प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलीस अधिकारी व जवानांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. दिंडीचा समारोप शाळेत संविधानाच्या सामूहिक वाचनाने करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांची रुजवणूक करण्यासोबतच शिस्त, नेतृत्व, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेमाची भावना विकसित करणारा हा उपक्रम लक्षवेधी ठरला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे तज्ञ संचालक भास्कर पाटील, अध्यक्ष रमेश ढेपे, मुख्याध्यापक रवी ढगे, ज्येष्ठ शिक्षक प्रल्हाद पवार, पांडुरंग पाटील, सुषमा चिलकर, रेवती दमकोंडवार, सुप्रिया लांडगे, माया शिंदे, रमेश हनमंते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधानाच्या जयघोषात नांदेडमध्ये भव्य संविधान रॅली

समाजकल्याण विभागाचा पुढाकार; संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन, विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



नांदेड जिल्हा प्रतिनिधी : – भारतीय संविधानातील मूल्यांचा प्रसार, नागरिकांमध्ये लोकशाहीविषयी जाणीव आणि संविधानाने दिलेल्या अधिकार व कर्तव्यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने येथील सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाच्या वतीने संविधान दिनानिमित्त शहरात भव्य संविधान रॅली काढण्यात आली. या रॅलीत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचनही करण्यात आले.

रॅलीच्या प्रारंभी सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास, तर जिल्हा समाजकल्याण अधिकारी रेखा शेंडगे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर शिवानंद मिनगीरे आणि रेखा शेंडगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला प्रारंभ करण्यात आला.

महात्मा ज्योतिबा फुले पुतळा ते शिवाजीनगर, कलामंदिर, पोलीस अधीक्षक कार्यालय चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत रॅली काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पोलीस बँड पथकाने राष्ट्रगीताची धून सादर केली.

यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटनांपैकी एक असून, जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने संविधानाचा अभ्यास करावा. संविधानाने दिलेले अधिकार समजून घेतानाच त्यातील कर्तव्यांचेही प्रामाणिकपणे पालन करावे, असे आवाहन केले. त्यानंतर उपस्थितांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. रॅलीत पोलीस बँड पथकाने देशभक्तिपर गीतांच्या धून सादर करून उत्साह निर्माण केला.

या रॅलीत मदर टेरेसा नर्सिंग स्कूल, सहयोग कॅम्पस, सिडको येथील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, नांदेड आदर्श विद्यालय, टिळकनगर येथील विद्यार्थी व शिक्षक, स्काऊट-गाईड, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, बार्टीचे समतादूत, विविध महामंडळांचे अधिकारी-कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, आजी-माजी सैनिक संघटना, पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक सहभागी झाले होते. यावेळी श्री हुजूर साहेब ब्लड सेंटर, नांदेड यांच्या वतीने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास समाजकल्याण विभागाचे समाजकल्याण अधिकारी गजानन नरवाडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त व्यक्ती व संस्थांचे प्रतिनिधी, अधिवक्ता इम्रान खान, विजय सुवर्णकार, एल. ए. हिरे, सुनील केंद्रे, ए. एस. पंडित, कैलास मोरे, लक्ष्मी गायके, पंडित खानसोळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

दुष्काळातही रेशीम शेतीतून लाखोंचे उत्पन्न; नांदेड रेशीम हब बनणार!

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :

दुष्काळी परिस्थितीतही कमी पाण्यात आणि योग्य तांत्रिक नियोजनातून रेशीम शेती फायदेशीर ठरू शकते. जिल्ह्यातील २०० हून अधिक शेतकऱ्यांनी चालू हंगामात रेशीम शेतीतून एक लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळविले आहे.

त्यामुळे नांदेड जिल्ह्याला रेशीम उत्पादनाचे प्रमुख केंद्र अर्थात रेशीम हब म्हणून विकसित करण्याचे नियोजन सुरू असल्याचे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक रेशीम कार्यालयाचे उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे यांनी केले.

सिल्क समग्र-२ योजनेअंतर्गत येथील जिल्हा रेशीम कार्यालय आणि भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (एसबीआय आरसेटी) यांच्या संयुक्त विद्यमाने २० ते २६ नोव्हेंबरदरम्यान मालेगाव रोड येथील एसबीआय आरसेटीमध्ये सात दिवसीय लाभार्थी सक्षमीकरण प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यातील ५० ते ६० शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी डॉ. ढवळे बोलत होते. त्यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी परभणी प्रादेशिक विस्तार केंद्राचे वैज्ञानिक डॉ. अशोक जाधव यांनी रेशीम कीटक संगोपनातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. एसबीआय आरसेटीचे संचालक कैलास जायभाये यांनी स्वयंरोजगार व वित्तपुरवठा योजनांविषयी मार्गदर्शन केले. डीएसटी प्रशिक्षक शिवप्रसाद माळवतकर यांनी तांत्रिक प्रशिक्षणाचे महत्त्व सांगितले, तर प्रशिक्षण विभागाचे प्राध्यापक आशिष राऊत यांनी प्रशिक्षणादरम्यान झालेली प्रात्यक्षिके व यशस्वी शेतकऱ्यांच्या अनुभवांची माहिती दिली.

जिल्हा रेशीम विकास अधिकारी अशोक वडवळे यांनी नांदेड जिल्ह्यात रेशीम विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन रेशीम शेतीच्या विस्तारासाठी आणि नांदेडला रेशीम हब म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. रेशीम शेतीमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न आणि स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

यावेळी रेशीम कार्यालयाच्या वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक कांचन जाधव, क्षेत्र सहाय्यक अमर सूर्यवंशी, नरोजी कोरके, अभय कुलकर्णी, संतोष कोल्हे, अनिल खिल्लारे, गजानन काचगुंडे, दत्ता कुस्कटे यांच्यासह जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित होते.

हिमायतनगर उपजिल्हा रुग्णालयात रुग्ण कल्याण समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न!

हिमायतनगर : हिमायतनगर येथील उपजिल्हा रुग्णालयात गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी रुग्ण कल्याण समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीला बाबुराव कोळी सर यांच्यासह माननीय जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके साहेब, तहसीलदार पल्लवी टेमकर मॅडम आणि नगरपंचायतीचे मुख्याधिकारी (सीओ) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शहरातील पत्रकार बांधवही उपस्थित होते.

बैठकीमध्ये रुग्ण कल्याण समितीला प्राप्त होणारा संपूर्ण निधी, निधीचा योग्य विनियोग, रुग्णालयातील मूलभूत सुविधा आणि विशेषतः पाणीटंचाईच्या गंभीर प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

रुग्ण कल्याण समितीच्या निधीचे योग्य नियोजन

उपजिल्हा रुग्णालयाला रुग्ण कल्याण समितीच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या निधीचा योग्य आणि पारदर्शक पद्धतीने वापर व्हावा, यावर बैठकीत भर देण्यात आला. रुग्णालयातील आवश्यक दुरुस्ती, स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि रुग्णांना आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधांसाठी निधीचा प्रभावी वापर करण्याबाबत नियोजन करण्यात आले.

हिमायतनगर उपजिल्हा रुग्णालयातील पाणीटंचाईचा प्रश्नही बैठकीत चर्चेचा महत्त्वाचा विषय ठरला. रुग्ण, त्यांचे नातेवाईक, डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि कर्मचारी वर्गाला पाण्याअभावी अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी पाणीपुरवठ्याबाबत योग्य नियोजन करण्यावर चर्चा झाली. यामध्ये नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांची उपस्थिती महत्त्वपूर्ण ठरली.

या बैठकीला तहसीलदार पल्लवी टेमकर मॅडम, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके साहेब, बाबुराव कोळी सर यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयातील सर्व डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होता. तसेच पत्रकार बांधवांनीही या बैठकीला उपस्थिती लावली.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य आणि गोरगरीब रुग्णांना हिमायतनगर उपजिल्हा रुग्णालयात दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, रुग्णालयातील मूलभूत समस्या दूर व्हाव्यात आणि उपलब्ध निधीचा योग्य वापर व्हावा, हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.

प्रशासन, आरोग्य विभाग आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून रुग्णालयातील पाणीटंचाईसह इतर समस्या मार्गी लागतील आणि रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .४४७/२०२६
किसन वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड आर.एल.मस्के)

ज्याअर्थी अर्जदार नामे **किसन रामराव वाघमोडे, रा.देवकी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या नातु नामे समर्थ रविंद्र वाघमोडे यांच्या दि. / / रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २६/१०/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१२३५/२०२६
अख्तर वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड बी.ई.खरात)

ज्याअर्थी अर्जदार नामे **अख्तर हैदरखा पठाण, रा.आमला, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, आमला, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे अख्तर हैदरखा पठाण यांच्या दि. ०१/०७/१९९० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २६/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :-११/०१/२०२७

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८९८/२०२६
पारुबाई वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड पी.एम.वाघमारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **पारुबाई बबन चव्हाण, रा.राजपिंपरी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, राजपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या पती नामे बबन खेरु चव्हाण यांच्या दि. १६/१०/२०१२ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०२/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :-१८/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .४८२/२०२६
रामदास वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड बी.ई.खरात)

ज्याअर्थी अर्जदार नामे **रामदास पि.श्रीमंत चव्हाण, रा.आमला, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, आमला, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या वडील नामे श्रीमंत सुखदेव चव्हाण यांच्या दि. २१/११/२०१३ व आई नामे शशिकला श्रीमंत चव्हाण यांच्या दि.२०/११/२००७ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :-१६/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २०२६
Friday, Dt. 27 November 2026
पान -४
PAGE - 4

त्रिपुरारी कार्तिक पौर्णिमा व गुरुनानक जयंती निमित्त कंकालेश्वर येथे भव्यदिव्य महादिपोत्सव श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी महंत शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबा महाराज यांच्या शुभ हस्ते महाआरती संपन्न







बीड प्रतिनिधी

त्रिपुरारी कार्तिक पौर्णिमा व गुरुनानक जयंती तसेच कार्तिक मास समाप्ती पर्व साजरे करण्याच्या निमित्याने सुनियोजित केलेला महादीपोत्सव, महाआरती सोहळा बीड जिल्ह्याचे ऐतिहासिक व आध्यात्मिक वैभव असलेले, बीडचे ग्रामदैवत, कुलदैवत, आराध्य दैवत श्री.क्षेत्र आदि अनादी महाशिव कंकालेश्वर मंदिर येथे नितिन भैय्या धांडे, नितीन जायभाय,संजय महाराज गुरव, केदार जाजू,सुरेश तात्या शेटे, विठ्ठल बहिर,गोपाल सारडा यांच्या गेल्या काही अनेक दिवसांच्या अथक परिश्रमांनंतर भव्य दिव्य रम्य तेजोमय दीप प्रकाशामध्ये शिवभक्त भाविकांच्या अलोट जनसागराच्या उपस्थितीत साजरा झाला.

कार्तिक पर्व समाप्ती संध्या- काळी पौर्णिमेच्या निमित्य हजारो भक्त भाविकांच्या उपस्थितीमुळे व हजारो दीपकांच्या प्रज्वलित तेजामुळे अद्भुत भव्य दिव्य आणि नयनरम्य असे भावविभोर करणारे शिवलोकीय वातावरण निर्माण झाले होते. सगळीकडे एकच हर हर महादेव असा भावघोष- जयघोष भक्त भाविकांमध्ये निनादत होता .

अशा मंगलमय वातावरणामध्ये हजारो भाविक बंधू भगिनींनी तसेच ज्येष्ठ लहानं थोरांनी, सर्वांनीच श्री कार्तिक स्वामींच्या, श्रीराम भक्त हनुमान, श्री प्रभू रामचंद्राच्या व श्री भगवान शिवांच्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. अशा भक्तिमय भावविभोर वातावरणामध्ये सर्व भाविक भक्तांनी हजारो हजारो दीपक प्रज्वलित करून आराध्य शिवांना अर्पण केले.

यामुळे खूपच सुंदर अशी देव दिवाळी साजरी झाली. त्यातच कंकालेश्वर मंदिराच्या उजव्या बाजूला आकाशात पौर्णिमेच्या पूर्णाकृती तेजोमय चंद्राच्या प्रकाशात शिवनगरी कंकालेश्वर क्षेत्राला भव्य दिव्य असे स्वरूप प्राप्त झाले होते. याप्रसंगी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे महंत हभप नवनाथ बाबा महाराज यांच्या व भाविक भक्तांच्या हस्ते आणि उपस्थितीमध्ये भगवान श्री गणेश, भगवान कार्तिक स्वामी, भगवान महाशिव, भगवान जगदीश्वर यांच्या आरत्या करण्यात आल्या.

अशा वातावरणामध्ये पंजाबी सिंधी समाजाच्या बंधू-भगिनींनी फार मोठ्या संख्येने सहभाग घेत गुरुनानक देवजी यांची सर्व भाविक भक्तांसोबत महाआरती केली. काल झालेल्या या महादीपोत्सव प्रसंगी चार हजारांपेक्षाही अधिक दीपक प्रज्वलित करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांसह शेकडो-हजारो भाविक भक्तांनी भगवान शिवांच्या चरणी भक्ती भावाने दीप प्रज्वलित करून अर्पण करत सहभाग घेतला आहे.

उमरीचे सुपुत्र शिक्षक संभाजी सोनवणे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान.!

आमदार प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते सहपत्नीक सन्मान, केज तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा

केज (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील उमरी गावचे सुपुत्र तथा जवळबन येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत कार्यरत असलेले शिक्षक संभाजी सोनवणे यांना सन २०२६ चा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय व अल्पसंख्याक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.

महाराष्ट्र विधान परिषदेचे शिक्षक आमदार मा. प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते संभाजी सोनवणे यांना सहपत्नीक हा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. संतोष गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



शिक्षक संभाजी सोनवणे यांनी जवळबन येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत कार्यरत असताना शैक्षणिक कार्यातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची या पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली आहे.

उमरी गावचे सुपुत्र असलेल्या संभाजी सोनवणे यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने उमरी, जवळबनसह संपूर्ण केज तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, शिक्षकवृंद, मित्रपरिवार, नातेवाईक आणि शिक्षणप्रेमींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नागरिकांच्या जिवाशी खेळ नको, नगरसेवकांचे महावितरणविरोधात आमरण उपोषण

धोकादायक वीजतारा, जीर्ण खांबांचा प्रश्न ऐरणीवर, प्रभाग १२ मधील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आंदोलन

देगलूर (वा.) प्रतिनिधी

शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये धोकादायक अवस्थेत असलेल्या विद्युत तारा, जीर्ण व वाकलेले विद्युत खांब आणि नवीन पोल व डीपी उभारण्याच्या प्रलंबित प्रश्नावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे बांधकाम सभापती सुमंत कांबळे यांच्यासह तिघांनी बुधवार (दि. २५) पासून महावितरण कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. वारंवार निवेदने देऊनही महावितरण प्रशासनाकडून कार्यवाही होत नसल्याने नागरिकांच्या जीविताचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

प्रभागातील कांतीनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, नाथनगर, शिवबानगर, विद्यानगर, ११/८ हनुमाननगर, दत्तनगर, रामपूर रोड, शहाजीनगर, होट्टल बेस गल्ली आणि भट गल्ली या परिसरांत अनेक ठिकाणी विद्युत तारा खाली लोंबकळत आहेत. काही ठिकाणी तारा जीर्ण झाल्या असून, जुने व वाकलेले विद्युत खांबही अपघाताला निमंत्रण देत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



या समस्येबाबत २६ ऑक्टोबर रोजी महावितरणच्या उपविभागीय अभियंत्यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. तसेच २५ नोव्हेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला होता.

मात्र, मागण्यांवर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर आंदोलकांनी उपोषणाचे पाऊल उचलले.

तातडीने कामे पूर्ण करण्याची मागणी..

खाली लोंबकळणाऱ्या विद्युत तारांची दुरुस्ती, जीर्ण तारा बदलणे, आवश्यक ठिकाणी नवीन विद्युत पोल उभारणे, वाकलेले खांब बदलणे, नवीन डीपी बसविणे तसेच संपूर्ण प्रभागाची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कामे तातडीने पूर्ण करावीत, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.

एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा संभाव्य धोका वेळीच दूर करावा, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. महावितरण प्रशासन या आंदोलनाची कितपत दखल घेते आणि प्रभागातील विद्युत समस्यांवर कधी तोडगा निघतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

भारतीय संविधान सर्व धर्म आणि समाज घटकांना जोडणारा राष्ट्रीय ग्रंथ - भिक्खू पय्यानंद थेरो

महाविहार धम्मसेवक संघ, लातूरच्यावतीने ७७ वा संविधान दिन उत्साहात साजरा

लातूर प्रतिनिधी

भारतीय संविधान हे केवळ देशाचा कारभार चालविणारे कायद्याचे पुस्तक नसून सर्व धर्म, जाती आणि समाजघटकांना एकत्र जोडणारा राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा, स्वातंत्र्याचा, बंधुतेचा आणि न्यायाचा अधिकार दिला असून संविधानातील मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले.

महाविहार धम्मसेवक संघ, लातूर यांच्यावतीने ७७वा संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सामूहिकरीत्या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. तसेच महिला धम्मसेवक उपासिकांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी 'भारतीय संविधान चिरायू होवो', अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात महामानवाच्या पूर्णाकृती पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर त्रिसरण व पंचशील ग्रहण करून धम्ममय वातावरणात कार्यक्रमाला प्रारंभ झाला. महाविहार धम्मसेवक संघाच्यावतीने उपस्थितांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून संविधानाप्रती आपली निष्ठा व्यक्त केली.

पुढे बोलताना पु. भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, संपूर्ण भारत देशात संविधान दिन साजरा केला जात आहे. भारतीय संविधान हे सर्व धर्मांना जोडण्याचे आणि देशातील विविधतेत एकता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. एकेकाळी देशात सामाजिक विषमता, असहिष्णुता आणि झुंडशाहीचे



वातावरण निर्माण झाले होते. अशा प्रकारची विषमता देशाच्या अखंडतेसाठी आणि सामाजिक एकात्मतेसाठी पोषक नव्हती. त्यामुळे सर्वांना समान न्याय, समान अधिकार आणि सन्मानाने जगण्याची संधी देणाऱ्या नव्या संविधानाची देशाला आवश्यकता होती.

या ऐतिहासिक गरजेची पूर्तता करण्यासाठी विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या विद्वत्तेच्या, दूरदृष्टीच्या आणि अथक परिश्रमांच्या बळावर भारताला जगासमोर आदर्श ठरावे असे संविधान मिळाले. हे संविधान कोणत्याही एका धर्माचे, जातीचे किंवा विशिष्ट समाजाचे नसून संपूर्ण भारतीयांचे आहे. त्यामुळे भारतीय संविधानाला राष्ट्रीय ग्रंथ म्हणून सन्मान देऊन त्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारली पाहिजेत, असे आवाहनही भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले.

या वेळी भंते बोधिराज, नवनाथ आल्टे, राहुल कांबळे, लाला सुरवसे, अक्षय धावारे, यशपाल कांबळे, विनोद कोल्हे, विवेक सिरसाट, प्रा.डॉ. संजय गवई, भाऊ कांबळे, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, जोतिराम लामतुरे, विलास आल्टे, हिराचंद गायकवाड, नागोराव कांबळे, राजेश कदम, करण ओव्हाळ, सतीश मस्के, राजू सूर्यवंशी, शाहूराज कांबळे, दिलीप कांबळे, शिवाजी कांबळे, रोहिदास सोनकांबळे, सुधाकर कांबळे, मोहन कांबळे, अर्जुन किणीकर, यशवंत गायकवाड, प्रकाश बनसोडे, शंकर शिंदे, व्ही.आर.बोरिकर, विक्रम सिरसाट, अंतेश्वर थोटे, चंद्रसेन भडके, सिद्धार्थ सूर्यवंशी, मिलिंद धावारे, आशा चिकटे, सुजाता अजनिकर, सरिता बनसोडे, मयुरी आल्टे, सुमन उडानशिव, विद्या ससाणे, स्वाती सूर्यवंशी, पंचशीला बनसोडे, वंदना वाहुळे, शकुंतला गंभीरे, शामल कांबळे, प्रेमीला आपटे, करुणा सूर्यवंशी, पंचशीला भडके, अस्मिता शाक्यमूणी, कविता कदम, शकुंतला नेत्रगावकर, अनुसया कांबळे, करुणा कांबळे, आशा जानराव, सह शाक्यसंघ माता भिमाई सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी संघ, महाविहार धम्म सेवक संघचे सर्व सदस्य, विविध नगरातील बौद्ध उपासक उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

बेटमोगरा येथे मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने २६ नोव्हेंबर संविधान दिन साजरा

मुखेड / प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मौजे बेटमोगरा येथील मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सामाजिक सेवाभावी बहुउद्देशीय संस्था मागील १२ वर्षांपासून विविध प्रकारचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, दिव्यांग, एकल महिला (विधवा), शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, अल्पभूधारक, भूमिहीन, सर्वसामान्य नागरिकांसह एकंदरीत मानव कल्याणासाठी विविध उपक्रम राबवित असते त्या अनुषंगाने दि.२६ नोव्हेंबर २०२६ रोजी भारतीय संविधान दिनी संस्थेचे संस्थापक सचिव तथा पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांनी आपल्या सपत्नीक

भारतीय संविधानाची निर्माते,युगपुरुष,महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस धूप, दीप प्रज्वलित करुन अभिवादन केले. तद्नंतर उपस्थितांच्या समवेत भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकाचे (उद्देशिकाचे) सामुहिकरीत्या संकल्प वाचन



करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव तथा पत्रकार भारत सोनकांबळे यांनी उपस्थितांना भारतीय संविधानातील विविध कलमांची माहिती देवून नागरिकांना २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधानाने दिलेल्या हक्क व अधिकार विषयी आणि संविधांनाचे सर्व नागरिकांना मूल्य समजावे आणि भारतीय संविधानाच्या माध्यमातून संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सर्व महिलांना दिलेले हक्क अधिकार विषयी माहिती दिली. यावेळी पत्रकार भारत सोनकांबळे, सागरबाई सोनकांबळे, श्वेताताई सोनकांबळे, दशरथ जाधव,रत्नाकर सोनकांबळे, उगवताबाई जाधव, अनिताबाई सोनकांबळे,रोहिणी सोनकांबळे, इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

साबला येथे संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा



केज/प्रतिनिधीः केज तालुक्यातील मौजे साबला येथे संविधान दिन हा मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी समाजसेवक नरहरी काकडे, रंगनाथ काकडे, सदाशिव काकडे, श्रीमंत काकडे, गणेश कटारे, गुलाब मुळे, महादेव काकडे, पांडुरंगकाकडे, माऊली नाईकनवरे, ज्ञानेश्वर मुळे, रामराजे शिंदे, धनंजय नाईकनवरे रामभाऊ काकडे, भागवत काकडे, जालिंदर मुळे, आश्रुबा काकडे, बाबासाहेब काकडे, राजेभाऊ काकडे, श्रीहरी काकडे, वसंत नाईकनवरे, सोमेश काकडे, राहुल मुळे इत्यादींच्या उपस्थितीत संविधान दिन साजरा करण्यात आला.

बाळासाहेब गायकवाड यांचे निधन



केज प्रतिनिधी

बनसारोळा परिसरातील सौंदना आंबा येथील ज्येष्ठ नागरिक बाळासाहेब भगवानराव गायकवाड (वय ७५) यांचे हृदयविकाराच्या धक्याने बुधवारी (दि.२५) रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर गुरुवारी सकाळी सौंदणा अंबा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, नातवंडे, दोन भाऊ असा परिवार आहे. स्वारातीम विद्यापीठाचे माजी कुलगुरू, प्राचार्य मधुकरराव गायकवाड व माजी ग्रंथपाल प्रा. नीलकंठ गायकवाड यांचे ते कनिष्ठ बंधू होत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).